MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२२

## संपादकीय

### अभियंता दिनाचे महत्त्व

दरवर्षी सप्टेंबर महिन्याच्या १५ तारखेला आपल्या देशात 'अभियंता दिन' साजरा केला जातो. या तारखेचे औचित्य असे की, या तारखेला महान भारतीय अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्म झाला होता. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या माणसाने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अतिशय मोलाची भर घातली. मैसूर येथील कृष्णराज सागर धरण, पुण्याजवळील खडकवासला धरण, महानदीवरील महाकाय धरण यांच्या उभारणीत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. त्याचबरोबर कर्नाटक राज्यातील लोखंड आणि पोलाद उद्योग, तसेच मैसूर सँडल सोपं या व्यवसायाला त्यांनी आकार दिला. या महान व्यक्तीची स्मृती जागविण्यासाठी हा दिवस दरवर्षी संपूर्ण भारतभर साजरा केला जातो.

वैज्ञानिक निसर्गाची गुपिते उलगडतात. त्यांच्या कार्यामुळे मूलभूत विज्ञान विकसित होते. अभियंता त्याच्याही पुढे जाऊन वैज्ञानिक तत्त्वांचा उपयोग करून यंत्रे बनवितात. त्यांच्या कार्यामुळे उपयोजित विज्ञानात भर पडत जाते. एक उदाहरण घेऊन हा फरक स्पष्ट करू या. भारतीय भौतिकशास्त्रज्ञ जगदीश चंद्र बोस यांना संशोधन करताना असे लक्षात आले की, रेडिओ तरंगाच्या मदतीने ध्वनी लहरी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचविता येतात. त्यांनी आपले हे संशोधन १८९७ मध्ये लंडनच्या रॉयल सोसायटीत सादर केले. जगदीश चंद्र बोस यांचे काम हे मूलभूत संशोधन या गटात मोडते. या संशोधनाचा उपयोग करून १९०३ मध्ये गुगलीएल्मो मार्कोनी या इटालियन अभियंत्याने अटलांटिक समुद्राच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यावर ध्वनी-संदेश पाठविण्यात यश मिळविले. त्यातून निर्माण झाले ते रेडिओ प्रसारण. आज रेडिओ केंद्राचे जाळे सर्वदूर पसरलेले आपण पाहतो. दूरचित्रवाणी प्रसारण देखील याच तत्त्वावर आधारित आहे. एवढेच नव्हे तर, भ्रमणध्वनी संपर्क यंत्रणा ही देखील जगदीश चंद्र बोसांच्या मूळ संशोधनावरच आधारलेली आहे. अशा प्रकारे तंत्रज्ञांनी जगदीश चंद्र बोस यांच्या मूळ संशोधनाचा वेगवेगळ्या कामांसाठी उपयोग करून घेतला आहे.

युरोपातील औद्योगिक क्रांतीनंतर तंत्रज्ञांची मोठ्या प्रमाणावर गरज भासू लागली. ती पूर्ण करण्यासाठी युरोपातील अनेक देशांत अभियांत्रिकी शिक्षण देणारी महाविद्यालये सुरू करण्यात आली. औद्योगिक क्रांतीचे पडसाद भारतावर देखील पडले. त्यांची दखल घेऊन भारतात १९४२ मध्ये कौन्सिल ऑफ सायन्टिफिक अँड इंडस्ट्रीयल रिसर्च या संघटनेची स्थापना करण्यात आली. त्यांच्या शाखा भारतभर विखुरलेल्या असून, प्रत्येक संस्था एकेका

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

घटकांवर आपले लक्ष केंद्रित करते. उच्च दर्जाचे अभियंते देशातच निर्माण व्हावेत यासाठी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या शिक्षण आणि संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला त्याची संख्या केवळ पाच होती. ती वाढत जाऊन आता २० च्या पुढे गेली आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागात त्या विखुरलेल्या आहेत. त्याचबरोबर राज्य आणि केंद्र सरकारने सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन केलेली आहेत. याखेरीज अनेक खासगी शैक्षणिक संस्थांनी अभियांत्रिकी शिक्षण देणाऱ्या संस्था काढल्या आहेत. आजच्या घडीला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जाळे देशभर पसरलेले आपल्याला पाहायला मिळते.

विद्या प्रसारक मंडळ ही ठाणे शहरातील एक प्रथितयश शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेने ठाणे आणि परिसरात असणाऱ्या विद्यार्थ्यांची गरज भागविण्यासाठी प्राथमिक शाळा ते स्नातकोत्तर शिक्षण देणारी महाविद्यालये उभारली आहेत. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात विद्या प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना ग्रामीण भागात एक अभियांत्रिकी महाविद्यालय असण्याची गरज भासू लागली. या कल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी या मंडळाने कोकणातील वेळणेश्वर या समुद्र किनारी असलेल्या गावाची निवड केली. या गावात एक प्रशस्त असे अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यात आले आहे. त्याचे नाव विप्रमंचे ‘महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय’ असे आहे. शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य सुरू झाले. मागील दशकात अनेक अभियंते या महाविद्यालयातून बाहेर पडले. या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने निवृत्त शास्त्रज्ञांचा एक गट तयार केला आहे. ही तज्ज्ञ मंडळी नियमितपणे महाविद्यालयाला भेट देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पात मदत करीत असतात.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय हे केवळ अभियांत्रिकी शिक्षण देणारी संस्था नसून, समाज प्रबोधनाचे ते एक केंद्र झाले आहे. शालेय शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन असे अनेक उपक्रम या महाविद्यालयात राबविले जातात. याखेरीज परिसरातील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे बौद्धिक सत्रे आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांना प्रकल्प देताना परिसरातील गरजांचा विचार केला जातो. काही वर्षांपूर्वी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेतातील तण काढण्यासाठी एक यंत्र विकसित केले होते. हे यंत्र ब्राझील मधील नोव्हो हॅम्बुर्गो या शहरात भरलेल्या मोस्ट्राटेक स्पर्धेत दाखविण्यात आले. परीक्षकांनी या यंत्राचे चांगलेच कौतुक केले. त्या स्पर्धेत या यंत्राला ब्रॉंझ पदक देऊन गौरविण्यात आले होते.

अभियंता हा समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे. आपण दररोज ज्या सुखसुविधांचा अनुभव घेतो त्या सुविधा अभियंत्यानीच आपल्याला उपलब्ध करून दिल्या आहेत. घरातील पंख्यापासून तर दवाखान्यातील इसीजी मशीन पर्यंत सर्व काही या अभियंत्यानीच निर्माण केल्या आहेत. अणुऊर्जा, अंतरिक्ष विज्ञान, संगणक या क्षेत्रात भारताने जी प्रगती केली त्याचे श्रेय या अभियंत्यानाच जाते. नुकतीच विमानवाहू युद्धनौका तयार करून भारतीय तंत्रज्ञांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. भारताला जर खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर करायचे असेल तर भारतीय तंत्रज्ञांनी धाडसी पावले उचलण्याची गरज आहे.


एकविसाव्या शतकात अनेक सुखसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्याचबरोबर अनेक समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. जसे वातावरणीय बदल, ऊर्जेची वाढती गरज, करोना सारख्या नवीन आजारांचा प्रादुर्भाव इत्यादी. या समस्या सोडविण्यासाठी अभियंत्यांनी पुढे सरसावणे आवश्यक आहे. अभियंता दिनाच्या निमित्ताने या जबाबदारीची जाणीव समाजाच्या सर्व घटकांना करून देणे गरजेचे आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष तेविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) आम्ही आनंदे नाचू गाऊ | डॉ. आनंद कुलकर्णी | ३ |
| ३) ब्रिटनमधील सत्तानाट्याचा अन्वयार्थ | डॉ शैलेंद्र देवळाणकर | ५ |
| ४) अणुस्फोटाचा सैद्धांतिक पाया | नरेंद्र गोळे | ७ |
| ५) परिसर वार्ता | संकलित | ११ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# आम्ही आनंदे नाचू-गाऊ

*संत नामदेवांच्या एका सुंदर अभंगावर भाष्य करणारा डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

काळ देहासी आला खाऊ ।
आम्ही आनंदे नाचू-गाऊ ।।१।।

कोणे वेळे काय गाणे ।
हे तो भगवंता मी नेणे ।।२।।

टाळ मृदुंग दक्षिणेकडे ।
माझे गाणे पश्चिमेकडे ।।३।।

नामा म्हणे 'बा केशवा ।
जन्मोजन्मी द्यावी सेवा' ।।४।।




संतश्रेष्ठ नामदेवांचा हा अभंग आहे. श्रीनिवास खळे काकांचं अनवट संगीत आणि सुरेश वाडकरांचा कसदार, मखमली आवाज यामुळे हा अभंग आपल्याला वेगळ्या प्रकारची अनुभूती देतो.

खरं तर जो जन्मल्या क्षणापासून आपल्याबरोबर आहे, जो सावलीसारखा रात्रंदिवस आपल्यासोबत असतो, जो आपल्यावर खरं आणि निर्मोही प्रेम करतो, जो आपल्या सर्वात जास्त जवळचा आहे, जो आपला मित्र, सखा आहे, जो सगळ्यांनी पाठ फिरवली तरी आपली संगत सोडत नाही असा आपला जिवलग! आपला संकटमोचक! तुम्हाला वाटेल एवढं लांबलचक मी कशाविषयी बोलतोय? आपला काळ-आपला मृत्यू. आपल्या मृत्यूइतका आपल्या जवळचा कोण आहे? सच्चा आणि समंजस सहचर. आपल्याकडून काहीही अपेक्षा न ठेवणारा आणि कशातही लुडबूड न करणारा. पण सर्वांनी टाकून दिल्यावर मायेने जवळ घेणारा, आपल्या कुशीत सामावून घेणारा आपला प्रियतम मृत्यू. एकवेळ जीवन दगा देईल, पण मृत्यू? कधीही नाही. जीवघेण्या, स्वार्थी काळातही मृत्यू सोबतच असतो. आपलेपणाचा दिलासा आणि सुटकेची उब देणारा वेदनानाशक सखा! असं असूनही आपण मृत्यूविषयी किती भीती बाळगतो! सतत भीती आणि शंका. हे सगळं विचित्रच आहे. ज्याचा कायम भरवसा आहे त्या मृत्यूची भीती आणि ज्याचा घडीभर भरवसा नाही त्या जीवनावर प्रीती! मृत्यू जीवन संपवत नाही, तर त्याचा सुखकर शेवट करतो. जगणं नकोस होतं तेव्हा ते सुंदर करणारा मृत्यूच तर असतो! मृत्यू म्हणजे जीवनाने कुरूप केलेल्या शरीर आणि मनाला दिलेली सुंदर गळाभेट! मृत्यू-काळ म्हणजे हरिचा दूत. मग हरिदूताला विन्मुख का पाठवायचं?

आता या अभंगातील पहिलं चरण बघा. काळ-मृत्यू देहाला खाणार आहे. देह संपणार आहे. पण असं

जाळणाऱ्या मोठ्या अग्नीपेक्षा उब देणारा लहान अग्नी चांगला असतो.

काहीतरी आहे जे देह संपला तरी उरणार आहे. चिरंतन, अविनाशी असं काहीतरी. अखंड आनंदाचा स्रोत! काय आहे ते? विठ्ठलाची सेवा-विठ्ठलाची भक्ती. काळाची तमा नाही कारण काळ देह संपवेल. पण 'काळ विठ्ठलाचं सान्निध्य संपवू शकत नाही' असं एक सूचन यात आहे. दुसरं सूचन म्हणजे नामदेवांनी काळाला आनंदाने स्वीकारलं आहे. जणू आपल्या मृत्यूचं नाचून-गाऊन नामदेव स्वागत करतायत्, आपला मरणसोहळा साजरा करतायत. अर्थात या सगळ्या मागे विठ्ठलभक्ती आहे. विठ्ठलभक्तीची किमया अशी की, नामदेव जीवन-मृत्यूकडे सारख्याच आनंदाने बघू शकतात. हे म्हणजे फक्त समचरण विटेवरी बघणं नाही, जगताना समदृष्टी ठेवणं आहे. जीवन म्हणजे देहातली भक्ती, मृत्यू म्हणजे विदेही भक्ती. विठ्ठल दोन्हीतही सोबतीला आहे. मग 'आम्ही आनंदे नाचू, गाऊ' असं होणारच ना !

एकदा का असा विठ्ठलावर 'घालोनिया भार राहिलो निश्चिंती' झालं, की मग कळीकाळाची भीती नाही. नामदेवांच्या आयुष्याची सूत्रं आता विठ्ठलाकडे सूपूर्द केलेली आहेत. आता विठ्ठल दाखवेल तो मार्ग, विठ्ठल देईल ती बुद्धी. नामदेवांची चिंता मिटली आहे. नामदेव आता विठ्ठल सांगेल तेच गातायत्. कोणत्या वेळी कोणतं गाणं गायचं हे विठ्ठल ठरवतो आणि नामदेव गातात. गाण्याची म्हणजे जीवन-मृत्यूची काळवेळ विठ्ठल ठरवतो. नामदेव फक्त गायकाची भूमिका वठवतायत्. केवळ नामरूप नामदेवांचे; कर्ता करविता विठ्ठल.

पण काळाची सावली तिसऱ्या चरणात अधिक गडद आणि अनाकलनीय होते. टाळ-मृदंगात ताल आहे, लय आहे म्हणजे काळ आहेच. काळाची ठरावीक अंतराने येणारी आवर्तनं आहेत. जन्म-मरणाचा, निर्मिती-नाशाचा लय-विलय चालू आहे. पण इथे गडबड आहे ती दिशेची. टाळ-मृदंग दक्षिणेकडे आणि नामदेवांचं गाणं पश्चिमेकडे असा कोड्यात टाकणारा प्रकार आहे. दक्षिणेकडे का? दक्षिण ही काळाची म्हणजे मृत्यूची दिशा आहे. ती आपण समजतो तशी वाईट, अशुभ नाही. ती शुभंकर, संजीवक आहे. सगळ्या जीवनाचं विसर्जन मृत्यूत होतं, तसं सगळ्या दिशांचं विसर्जन दक्षिण दिशेत होतं. म्हणून टाळ-मृदंगाची दिशा दक्षिणेकडे आहे. पण नामदेवांचं गाणं मात्र पश्चिमेकडे जाणारं आहे. पश्चिम ही मावळतीची दिशा आहे. एका अर्थाने अस्त दाखवणारी दिशा. नामदेवांचं गाणं म्हणजे जीवन पश्चिमेकडे चाललंय, अस्ताला चाललंय. मग ते दक्षिणेकडे का जात नाही. याचं उत्तर पुढच्या चरणात आहे. पश्चिम ही अस्ताची दिशा आहे पण तिच्यात उदयाची पदचिन्हही आहेत. 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल' तशी ही अवस्था. नामदेवांना जन्मोजन्मी विठ्ठलाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे. विठ्ठल ही इच्छा पूर्ण करेल याची त्यांना खात्री आहे. म्हणून मृत्यू तर येईलच, पण पुन्हा जन्म येईल आणि सेवेची संधी प्राप्त होईल. पश्चिम दिशा अशी मृत्यूनंतर जीवन देणारी दिशा आहे. मृत्यू तर आहेच, टाळ-मृदंगासारखा चिरंतन आहे. पण जीवनगाणं मृत्यूनंतरच्या जन्मात चालू राहील आणि विठ्ठलसेवा घडेल. नामदेव मृत्यूला स्वीकारतात, त्याचं स्वागत करतात, दक्षिणेकडे घेऊन जाणाऱ्या टाळ-मृदंगात तल्लीन होतात. पण त्यांचं गाणं मात्र पश्चिमेकडे जात राहतं. पुन्हा नव्याने जन्मून विठ्ठलभक्ती करण्यासाठी.

नामदेवांची ही किती सुंदर अनुभूती आहे. मृत्यूचं आनंदाने जसं स्वागत आहे तसं जीवनाचं विठ्ठलाला केलेलं समर्पणही आहे. टाळ-मृदंगाच्या सुरेल ठेक्यात विसर्जन केलं काय आणि मधूर गाण्यात विठ्ठलाला समर्पण केलं काय, दोन्हीही सारखंच सुंदर, सारखंच संजीवक!!

**- डॉ. आनंद कुलकर्णी,**
नारायणगांव

●●●

ज्ञान ही वारसा हक्काने मिळणारी इस्टेट नव्हे; ते अभ्यास व कष्ट करूनच मिळवावे लागते.

# ब्रिटनमधील सत्तानाट्याचा अन्वयार्थ

*इंग्लंडमध्ये सध्या एक प्रकारचे अनपेक्षित राजकीय अस्थिरतेचे वातावरण उद्भवले आहे याची कारणमिमांसा या लेखात विशद केली आहे – संपादक*

युरोपियन महासंघामधून बाहेर पडल्यानंतर आणि कोरोना महामारीचे संकट, रशिया-युक्रेन युद्धामुळे उद्भवलेली परिस्थिती या समस्यांचा सामना केल्यानंतर इंग्लंडमध्ये सध्या एक प्रकारचे अनपेक्षित राजकीय अस्थिरतेचे वातावरण उद्‌भवले आहे. याचे कारण इंग्लंडमधील सत्तेत असणाऱ्या हुजुर पक्ष किंवा कंझर्व्हेटिव्ह पक्षामध्ये बंड झालेले आहे. हे बंड खुद्द पंतप्रधान बोरीस जॉन्सन यांच्याविरुद्ध झाले आहे. या बंडाचा परिणाम म्हणून संपूर्ण मंत्रीमंडळाने राजीनामा दिला आणि पंतप्रधानांनाही राजीनामा द्यावा लागला. एका अर्थाने ती बोरीस जॉन्सन यांची हकालपट्टीच म्हणावी लागेल. परंतु ही वेळ येण्यापर्यंत पंतप्रधानपदावर चिकटून राहणेही अपमानास्पद आहे. तसेच, इंग्लंडच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ही अस्थिरता नकारात्मक आहे. याचे कारण इंग्लंड हा युरोपियन महासंघातून बाहेर पडल्यानंतर त्यांना आपला आर्थिक विकास घडवून आणणे हे एक फार मोठे आव्हान होते. युरोपियन महासंघाचे संरक्षण कवच नसल्यामुळे हा विकास स्वबळावर करायचा होता. या दरम्यान कोरोना महामारीमुळे आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे संपूर्ण जागतिक पटलावरच आर्थिक समस्या उद्भवल्यामुळे इंग्लंडमध्ये एक प्रकारची आर्थिक असुरक्षितता निर्माण झाली आहे. त्याच्यावर मात करण्यासाठी राजकीय स्थैर्य असणे गरजेचे होते. परंतु नेमक्या याच वेळी तेथे राजकीय अस्थिरता निर्माण झाल्याने परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.



बोरीस जॉन्सन यांचा विचार केल्यास त्यांची संपूर्ण कारकिर्द ही अनेक चढ-उतारांनी भरलेली राहिली. इंग्लंडला युरोपियन महासंघातून बाहेर काढण्याच्या 'ब्रेक्झिट' प्रक्रियेमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बोरीस जॉन्सन यांनी बजावली होती. २०१९ मध्ये ते पंतप्रधान झाल्यानंतर जेमतेम तीन वर्षे पूर्ण होत आली होती; पण ब्रेक्झिट यशस्वी झाल्यानंतर काही वर्षांतच आलेल्या कोरोनामुळे इंग्लंडचे फार मोठे नुकसान झाले. तथापि इंग्लंडमध्ये लसीकरण पूर्ण होण्यामध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. तसेच, या काळात जनतेवरील आर्थिक बोजा वाढू नये यासाठी करांचा भार कमी करण्याचा महत्त्वाचा निर्णय त्यांनी घेतला. असे असताना त्यांचे काही व्यक्तिगत निर्णय त्यांच्या अंगलट आले. यापैकी एक म्हणजे, संपूर्ण इंग्लंडमध्ये कोरोना संसर्गामुळे लॉकडाऊन असताना त्यांनी टेन डाऊनिंग स्ट्रीट या पंतप्रधान निवासामध्ये एका ओल्या पार्टीचे आयोजन केले. ही पार्टी हा ब्रिटनच्या जनतेसाठी धक्का होता. त्याचप्रमाणे त्यांनी पक्षप्रतोदाची निवड करताना त्यांनी लैंगिक छळाचे आरोप असणाऱ्या व्यक्तीला समर्थन दिले. तिसरे म्हणजे, जनतेवरील करांचा बोजा कमी केल्यामुळे इंग्लंडच्या सरकारी तिजोरीला मोठा फटका

बसला. कारण करसंकलन कमी झाले. या तिन्ही गोष्टी त्यांच्या विरोधात गेल्या. दुसरीकडे हुजुर पक्षामध्ये त्यांच्याविरोधात मोठी रस्सीखेच होती. त्यातूनच पक्षात बंडाचे हत्यार उपसले गेले.

या बंडाचे नेतृत्त्व ज्या दोन व्यक्तींकडे आहे ते दोघेही मूळचे ब्रिटनवासी नाहीत. यापैकी एक आहेत ते ऋषी सुनक आणि दुसरे आहेत ते साजिद जाविद. ऋषी सुनक हे जॉन्सन यांच्या मंत्रीमंडळात अर्थमंत्री होते; तर जाविद हे आरोग्यमंत्री होते. ऋषी सुनक हे भारतीय वंशाचे असून, इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांचे ते जावई आहेत. जाविद आणि सुनक यांनी सर्वांत आधी राजीनामे दिले आणि त्यानंतर राजीनामा सत्र सुरू झाले. आता तेथे नवीन पंतप्रधान निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

दोन दिवसांपूर्वी तेथील विरोधी पक्षाने म्हणजेच मजूर पक्षाने अविश्वासदर्शक ठरावाची मागणी केली गेली. विशेष म्हणजे हा ठराव बोरीस जॉन्सन यांच्याकडूनच मांडला गेला. त्याच्या विरोधात मतदान झाल्यामुळे ब्रिटनमध्ये सत्तांतर होणार नाही यावर शिक्कामोर्तब झाले. हुजूर पक्षच येत्या काळातही तेथे सत्तेत राहणार आहे; फक्त त्याचे नेतृत्त्व कोण करणार यासाठी आता शर्यत सुरू झाली आहे. या शर्यतीच्या मैदानात असणाऱ्या बहुतांश जणांचे मूळ इंग्लंडच्या बाहेरचे आहे, ही बाब लक्षात घ्यायला हवी. या शर्यतीत सध्या ऋषी सुनक आघाडीवर आहेत. ते व्यवसायाने डॉक्टर आहेत; तर जाविद हे एका टॅक्सीचालकाचे सुपुत्र आहेत. याचाच अर्थ सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्ती आज सत्तेतील सर्वोच्च स्थानापर्यंत पोहोचण्याच्या मार्गावर आहेत. इंग्लंड हा आजवर नेहमीच वर्णभेदासाठी ओळखला गेला आहे; भारतावरील दीडशे वर्षांच्या राजवटीत याचे अनेक कटू अनुभव भारतीयांनी घेतले आहेत. याच गोऱ्या लोकांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये अश्वेत वर्णियांवर कमालीचे अन्याय-अत्याचार केले होते. परंतु बोरीस जॉन्सन यांनी राजीनामा दिल्यानंतरच्या गेल्या दोन आठवड्यांमध्ये इंग्लंडच्या प्रसार माध्यमातून या उमेदवारांविषयी कोणतीही नकारात्मक टिप्पणी केली जात नाहीये. इंग्लंडचा पंतप्रधान कोणत्या वर्णाचा असेल याविषयी आता कसलीही चर्चा होत नाहीये. ही अर्थातच एक सकारात्मक आणि जमेची बाजू म्हणावी लागेल.

ब्रिटनच्या पंतप्रधानपदी कोणाची वर्णी लागते हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल; परंतु नव्या पंतप्रधानांपुढे आव्हानांचा डोंगर असणार आहे. किंबहुना नेतृत्त्व-बदलामुळे ब्रिटनची आर्थिक समस्या लागलीच नियंत्रणात येण्याच्या शक्यता फार कमी आहेत. यासाठी नव्या पंतप्रधानांना प्राधान्याने अनेक देशांबरोबर प्रलंबित असणारे मुक्त व्यापार करार मार्गी लावावे लागतील. ऋषी सुनक हे अर्थमंत्री असल्यामुळे त्यांना या आर्थिक बाबींची चांगली जाण आहे. ते उदारमतवादी विचारांचे नाहीयेत. बोरीस जॉन्सन यांनी करांचा बोजा कमी करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याला सर्वप्रथम विरोध सुनक यांनी केला होता. जनतेवरचा कर कमी केला जाता कामा नये, अशी सुनक यांची भूमिका राहिली आहे. ब्रिटनच्या सरकारी तिजोरीसाठी ही भूमिका योग्य असली तरी त्यामुळे त्यांच्याविषयी जनतेत काहीशी नाराजी आहे.

असे असले तरी भारताच्या दृष्टीने विचार करता सुनक यांची पंतप्रधानपदी वर्णी लागणे हिताचे ठरणार आहे. ज्या ब्रिटिशांनी इतकी वर्षे भारतावर राज्य केले त्या देशाच्या सर्वोच्च पदी भारतीय वंशाची व्यक्ती विराजमान होत असेल तर ती निश्चितच आपल्यासाठी अभिमानास्पद बाब म्हणावी लागेल. याखेरीज त्यांना भारताची समज चांगली आहे. याखेरीज अनिवासी

(पृष्ठ क्र. १० वर)

कोणी कौतुक करो व टीका लाभ तुमचाच, कौतुक प्रेरणा देते; तर टीका सुधारण्याची संधी.

# अणुस्फोटाचा सैद्धांतिक पाया

*अणुस्फोटाबद्दलची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

**क्रांतिक वस्तुमान**

निसर्गात आढळून येणारे सर्वात जड मूलद्रव्य आहे युरेनियम. आवर्तसारणीत हे सर्वात शेवटी असते. याचा अण्वांक ९२ असतो आणि सामान्यतः वस्तुमानांक असतो २३८. निसर्गतः आढळून येणाऱ्या युरेनियममध्ये हजारात सात या प्रमाणात युरेनियम-२३५ हा समस्थानिकही असतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सामरिक उपयोगाकरता जेव्हा अणुऊर्जेचा शोध घेण्याचे प्रयत्न निकराने सुरू झाले, तेव्हा या मूलद्रव्याच्या, या समस्थानिकाचे अनेक अज्ञात गुणधर्म समोर आले. अणुऊर्जेचा शोध लागला आणि त्या ऊर्जेतील युरेनियमचे महत्त्व अधोरेखित झाले. युरेनियमच्या छोट्याशा वस्तुमानात जगाचा विध्वंस करता येऊ शकेल इतकी ऊर्जा सामावली असल्याची कुणकुण लागली. मग त्या ऊर्जेच्या विमोचनाची आणि तिच्यावर नियंत्रण मिळवण्याची शर्यत सुरू झाली. शर्यतीत अमेरिका जिंकली; जर्मनी हरली. दोस्त राष्ट्रांनी जपानवर पहिली दोन अणुस्फोटके टाकून, त्या ऊर्जेवरील आपले नियंत्रण प्रदर्शित केले. हिरोशिमा आणि नागासाकी वरील स्फोटांच्या महात्म्यामुळे दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.

युरेनियममधील या ऊर्जेच्या विमोचनास कारण ठरली एक साखळी प्रक्रिया आणि अशी साखळी प्रक्रिया अविरत सुरू राहावी याकरता आवश्यक असलेले युरेनियम-२३५ चे किमान वस्तुमान. या किमान वस्तुमानास म्हणतात क्रांतिक वस्तुमान (१) विकिपेडियाच्या या दुव्यावर, युरेनियम-२३५ करता हे वस्तुमान ५२ किलोग्रॅम असल्याचे म्हटले आहे. मात्र युरेनियमची घनता (२) १९.१ ग्रॅम/घन सेंमी इतकी असल्याने, प्रत्यक्षात २.७२३ लिटर इतकेच त्याचे आकारमान भरत असते. म्हणजेच पर्यायाने, एवढ्याशा युरेनियम-२३५ या पदार्थाने अणुस्फोट घडवून आणला जाऊ शकतो, असे तेव्हा लक्षात आलेले होते. युरेनियम-२३५ करता क्रांतिक वस्तुमान किती असू शकते याचा अदमास एन्रिको फर्मी ह्यांना लागला होता. अमेरिकेतील एका फुटबॉल मैदानात नैसर्गिक युरेनियमची प्रत्यक्ष थप्पी रचून क्रांतिक वस्तुमान नेमके किती आहे याचा १९४४-४५ मध्ये ते शोधच घेत होते. तो एका वेगळ्याच लेखाचा विषय आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनी आणि अमेरिका हे दोन्हीही पक्ष क्रांतिक वस्तुमान नेमके किती आहे याचाच निकराने शोध घेत होते. आजही सर्वच देशांत याबाबत गोपनीयता पाळली जात असल्याने क्रांतिक वस्तुमान नेमके किती आहे याबाबत निरनिराळ्या देशांची आपापली अघोषित अनुमाने आहेत. ही अनुमाने कधीही उघड होणार नाहीत. मात्र, ही सारी भानगड काय आहे, त्याचाच हा सोप्या शब्दांत सांगितलेला कथाभाग आहे.

**स्फोट म्हणजे काय?**

प्रचंड ऊर्जा, कमीत कमी जागेत, कमीत कमी काळात मुक्त झाली तर आजूबाजूचे वातावरण तत्काळ तापून, तिथली हवा हलकी होऊन वर जाते. आजूबाजूची हवा तिथे खेचली जाते. तीही तापून वर जात राहते. अशा घटनेलाच स्फोट म्हणतात. स्फोटाच्या जागी मग पोकळी निर्माण होऊन आसपासची हवा तिथे अत्यंत वेगाने खेचली जाते. यामुळे वादळे निर्माण होऊन, त्या वादळांच्या कचाट्यात येणाऱ्या वस्तू, स्फोटाच्या जागी प्रथम खेचल्या जाऊन उंच आकाशात भिरकावून दिल्या

जातात. त्यांचे तापमान कमी होता होता त्या आकाशभर पसरत जातात आणि थंड झाल्यावर जड होऊन दूरवर जाऊन जमिनीवर पडतात. कुठल्याही स्फोटाचे वर्णन असेच करता येईल. या प्रक्रियेत आसपासच्या परिसरातील चराचराचा जो प्रचंड विध्वंस घडून येतो तेच स्फोटाचे फलित असते. मात्र इतर स्फोट आणि अणुस्फोट यांच्यातील फरक असा की, त्याच वजनाच्या अणुस्फोटकात, साध्या रासायनिक स्फोटकाहून किमान एक अब्जपट, (म्हणजे एकावर नऊ शून्ये इतकी) ऊर्जा जास्त असते. अणुस्फोटकाची ऊर्जा-सघनता हाच मुद्दा कळीचा आहे. म्हणूनच हिरोशिमाच्या अणुस्फोटात लाखभर माणसे क्षणार्धात स्फोटग्रस्त झाली. त्यांपैकी अर्धी जागीच मृत्यू पावली. याचे कारण हा ऊर्जा-घनतांतील फरकच आहे.

### युरेनियमचे स्फोटक सामर्थ्य


निसर्गतः आढळून येणारे युरेनियम हे मूलद्रव्य ढोबळपणे दोन घटकांचे बनलेले असते. वजनाने दर हजारात ७ भाग या प्रमाणात आढळणारे युरेनियम-२३५ हे मूलद्रव्य आणि दर हजारात ९९३ भाग या प्रमाणात आढळणारे युरेनियम-२३८ हे मूलद्रव्य. ही दोन्हीही मूलद्रव्ये परस्परांची समस्थानिके आहेत. म्हणजे त्यांचे अण्वांक (९२) एकच आहेत आणि ते आवर्त सारणीत एकाच जागी वसलेले असतात. त्यामुळेच तर त्यांना परस्परांची समस्थानिके म्हणतात. मात्र त्यांचे अणुभार किंवा वस्तुमानांक मात्र निरनिराळे असतात (अनुक्रमे २३५ आणि २३८). म्हणून ते निरनिराळ्या मूलद्रव्यांच्या स्वरूपात परस्परांहून वेगळे आढळतात.

विरक्तक म्हणजे न्यूट्रॉन. अण्वंतर्गत धनक (प्रोटॉन), विजक (इलेक्ट्रॉन) व विरक्तक (न्यूट्रॉन), या कणांपैकी विद्युतभार नसलेला कण. युरेनियम-२३५ हे मूलद्रव्य कितीही ऊर्जा धारण करणाऱ्या विरक्तकांनी धडकवले असता त्याचे विदलन होते असे आढळून आलेले आहे. विदलन म्हणजे फिजन. सर्वात अवजड अणूंवर विरक्तक धडकवल्यास घडून येणारी आण्विक प्रक्रिया. विरक्तकाच्या ऊर्जेच्या चढत्या क्रमावर अवलंबून अनुक्रमे परस्पर स्वभावांतरण (ट्रान्सम्युटेशन), अनावरण आणि उचल (स्ट्रिपिंग अँड पिक-अप), विदलन (फिजन), विखंडन (स्पॅलेशन), विदारण (फ्रॅगमेंटेशन) आणि विखुरण (स्कॅटरिंग) अशा सहा निरनिराळ्या प्रकारच्या प्रक्रिया घडून येत असतात. त्यातील विदलन प्रक्रिया. अशा विदलनात एकाहून अधिक विरक्तक निर्माण होत असतात. निर्माण झालेले विरक्तक जर पुन्हा युरेनियम-२३५ अणुलाच धडकले तर पुन्हा विदलन घडून येऊ शकते. अशा प्रकारे दर विदलनात एकाहून अधिक विरक्तक निर्माण होत राहून, आसपासचे युरेनियम-२३५ चे सर्व अणू संपेपर्यंत साखळी प्रक्रिया सुरू राहू शकते. यापैकी दर विदलन प्रक्रियेत सुमारे २० कोटी विजकव्होल्ट किंवा $८.८८ \times १०^{-१८}$ एकक विजेइतकी ऊर्जाही बाहेर पडत असते. एक ग्रॅम मोल पदार्थात सुमारे $६.०२३ \times १०^{२३}$ (ॲव्होगाड्रोज नंबर) अणू असतात. हे लक्षात घेता निरंतर चालणाऱ्या साखळी प्रक्रियेत अतिप्रचंड ऊर्जा मुक्त होऊ शकते. म्हणजे केवळ २३५ ग्रॅम वजनाच्या युरेनियम-२३५ चे विदलन झाल्यास, $८.८८ \times १०^{-१८} \times ६.०२३ \times १०^{२३} = ५३.४८$ लक्ष एकक विजेइतकी किंवा ५,३४८ मेगॅवॉट वीज तासभर मिळू शकेल इतकी ऊर्जा मुक्त होईल. पारंपरिक स्फोटकांनी मुक्त केलेली ऊर्जा ज्या एककांत मोजतात त्यास टन-टी.एन.टी. म्हणतात. म्हणजे टेट्रानायट्रोटोल्यूईन या रासायनिक विस्फोटकाच्या एक टन वजनाच्या द्रव्याचा स्फोट घडवून आणला असता मुक्त होणारी ऊर्जा. ही सुमारे १ अब्ज कॅलरी इतकी किंवा सुमारे ४.२ अब्ज ज्यूल्स इतकी असते. त्यामुळे, किलोटन टी.एन.टी. परिमाणात ही ऊर्जा ०.३५४ किलो टन टी.एन.टी. इतकी होईल. तुलना करायची झाल्यास असे सांगता येईल की, हिरोशिमा येथे ६ ऑगस्ट १९४५ रोजी टाकण्यात आलेल्या अणुस्फोटकातील ऊर्जा १५ किलो टन टी.एन.टी. इतकी म्हणजेच २३५ ग्रॅम युरेनियम-२३५ मधील विदलन ऊर्जेच्या सुमारे ४२ पट इतकी होती. ही एवढी प्रचंड ऊर्जा सघनता हेच युरेनियम-२३५ चे अमोघ सामर्थ्य आहे. अख्ख्या मुंबई शहरास तासभर

पुरुन उरेल एवढी ही वीज आहे. २३५ ग्रॅम युरेनियम-२३५ चे आकारमान केवळ १२.३ घन सें.मी. इतके म्हणजे पसाभरही होत नाही.

### अणुस्फोट व त्याचे पर्यवसान

कमी ऊर्जेने गतीमान असलेला विरक्तक युरेनियम-२३५ अणुगर्भास धडकला असता, तो अणुगर्भात पकडला जाऊन, अणुगर्भाची एकूण ऊर्जा वाढते. अतिरिक्त ऊर्जेमुळे अस्थिर होऊन मग तो अणुगर्भ उत्स्फूर्ततेने दुभंगतो. या प्रक्रियेस विदलन असे म्हणतात. विदलन प्रक्रियेत युरेनियम-२३५ मूलद्रव्याचे अंदाजे दोन, एकसारख्या आकाराचे तुकडे होतात. हे तुकडे म्हणजे युरेनियम-२३५ च्या तुलनेत, सुमारे अर्ध्या वस्तुमानाची मूलद्रव्येच असतात. जशी की क्रिप्टॉन आणि बेरियम. त्यांना विदलन निष्पादने म्हणतात. सोबतच सरासरी सुमारे तीन विरक्तकही मुक्त होत असतात आणि त्याशिवाय दर विदलनागणिक सुमारे २०-कोटी-विजकव्होल्ट किंवा $८.८८x१०^{-१८}$ एकक विजेइतकी ऊर्जाही निर्माण होत असते. हे सारेच ऊर्जा-विमोचन सेकंदाच्या सूक्ष्मातिसूक्ष्म भागात घडून येऊ शकते.




थोडक्यात, अणुस्फोट ही युरेनियम-२३५ या किंवा तत्सम अत्यंत ऊर्जासघन द्रव्यात वस्तुमानाच्या स्वरूपात साठवलेली प्रचंड ऊर्जा, निरंतर चालणाऱ्या विदलनाच्या साखळी प्रक्रियेद्वारे, सूक्ष्मातिसूक्ष्म काळात, बिंदूमात्र अवकाशात, एकाचवेळी मुक्त करण्याची प्रक्रिया आहे. यामुळे जिथे स्फोट होतो त्या ठिकाणापासून अनेक किलोमीटरपर्यंत संपूर्ण विध्वंस घडून येतो. आनुषंगिक नुकसान सर्व जगभरच जाणवते. एवढेच नव्हे तर, या विध्वंसाचे मानवी शरीरावरील काही परिणाम पुढील अनेक पिढ्यांपर्यंत टिकून राहणारे असतात.

### युरेनियम-२३५ ची संहती कशी साधली जाते?

मात्र हे सारे तेव्हाच घडू शकेल जेव्हा युरेनियम-२३५ चे क्रांतिक वस्तुमान एकत्र येईल. युरेनियम-२३५ हे द्रव्य अत्यंत ऊर्जा सघन आहे. वर्तमान निसर्गात ते अत्यंत विखुरलेल्या अवस्थेत असल्याने त्याचा किरणोत्साराविना दुसरा कोणताच त्रास आपल्याला होत नाही. अर्थातच हे द्रव्य जर एकत्र आले तर त्याचा विस्फोट होणे आणि ते द्रव्य पुन्हा विखरून विरल होणे ही प्रक्रिया नैसर्गिक आहे. म्हणूनच हे मूलद्रव्य हजारात सात इतक्या विरल प्रमाणात, नैसर्गिक युरेनियममध्ये विखुरले गेलेले आहे. या नैसर्गिक विरलीकरण प्रक्रियेच्या विरुद्ध प्रक्रिया साधून, युरेनियम-२३५ ची संहती (कॉंसेंट्रेशन) साधता आली तर स्फोट घडवता येईल. मात्र ती साधायची कशी?

विदलनकारी पदार्थाचे वस्तुमान आणि समृद्धी (संहती, सघनता पातळी) हेच त्या नमुन्याच्या वस्तुमानाची क्रांतिकता ठरवतात. जर वस्तुमान एका अतिपातळ तक्त्याच्या स्वरूपात असेल तर, बव्हंशी मुक्त विरक्तक, विदलनकारी पदार्थाच्या अणूच्या संपर्कात येण्याऐवजी अवकाशात विखरून जातील. एखाद्या निश्चित पृष्ठभागात बंदिस्त केलेल्या आकारमानांमधे चेंडूसारख्या गोल आकारातच जास्तीत जास्त आकारमान सामावत असल्यामुळे, तोच आकार अणुस्फोटकास योग्य ठरतो. युरेनियम-२३५ चे क्रांतिक वस्तुमान, एका चेंडूसारख्या गोलात एकत्र गोळा केल्यास, त्याचा स्वयंस्फूर्तीने स्फोट होऊ शकतो. या वस्तुमानास युरेनियम-२३५ चे क्रांतिक वस्तुमान म्हणतात. रासायनिक संहती साधणे ही प्रक्रिया, अगदी क्षारापासून आम्ल तयार करणे, ऊसापासून साखर तयार करणे इत्यादी प्रक्रियांसारखीच असते. नंतर क्रांतिक वस्तुमान भौतिक संपर्कात एका जागी येण्याने कमी

क्षमतेचा स्फोट घडून येऊन सारी जुळणी उधळून जाऊ शकते. म्हणून क्रांतिक वस्तुमानाच्या दोन, सुमारे सारख्या तुकड्यांत युरेनियम-२३५ गोळा केला जातो आणि बंदुकीच्या गोळ्या परस्परांवर उडवाव्यात अशा त्वरेने ही दोन वस्तुमाने परस्परांस धडकावीत अशी सोय केली जाते. या यांत्रिक सोयीलाच बत्तीची व्यवस्था म्हणतात. चाप दाबल्यावर मग बत्ती दिली जाते, दोन अर्धी क्रांतिक वस्तुमाने परस्परांस धडकतात. एक पूर्ण, क्रांतिक वस्तुमान सूक्ष्मांश सेकंदाकरता तयार होऊन साखळी प्रक्रिया सुरू केली जाते, सूक्ष्मांश सेकंदात ती परिणत होते आणि सर्व क्रांतिक वस्तुमानातील सर्व ऊर्जा एकदम उधळून, सूक्ष्मांश सेकंदात पूर्णही होते. मग वरील स्फोट म्हणजे काय? या परिच्छेदात वर्णिल्यानुसार घटना घडून येतात आणि स्फोटाचे इतिकर्तव्य असलेला विध्वंस प्रत्यक्षात घडवून आणतात.

अणुऊर्जा संयंत्रात मात्र क्रांतिक वस्तुमान खूपच नियंत्रित पद्धतीने एकत्र केले जाते, हाताळले जाते आणि विमोचित ऊर्जा काढून घेतल्यानंतरच प्रक्रियेस पुढे जाऊ दिले जाते, त्यामुळे सर्व ऊर्जा एकसमयावच्छेदेकरून मुक्त होऊच शकत नाही आणि त्यामुळे स्फोट होत नाही.

**संदर्भः**


१ विकिपेडियावरील क्रांतिक वस्तुमानाची माहिती https://en.wikipedia.org/wiki/Criticalšmass. या दुव्यावर युरेनियम-२३५ करता हे वस्तुमान ५२ किलोग्रॅम असल्याचे म्हटले आहे.

२ युरेनियमची घनता https://www.energy.gov/ne/nuclear-fuel-facts-uranium.



**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पू.)-४२१२०१

भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५

Email : narendra.v.gole@gmail.com


•••

(पृष्ठ क्र. ६ वरून – **ब्रिटनमधील सत्तानाट्याचा अन्वयार्थ**)

भारतीयांच्या वाढत्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रभावाची पावती यातून मिळणार आहे. आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या मंत्रिमंडळात अनेक मंत्री भारतीय वंशाचे आहेत. आता ब्रिटनमध्ये सुनक यांची निवड झाल्यास तो एकप्रकारे कळसाध्याय म्हणावा लागेल.

ब्रिटनचे नवे पंतप्रधान विस्कळीत झालेली आर्थिक घडी कशी पूर्वपदावर आणतील हे पाहणे औचित्याचे असेल. यासाठी त्यांना इंग्लंडमधील परकी गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. प्रलंबित व्यापार करार पूर्णत्वास न्यावे लागतील. त्याचबरोबर बोरीस जॉन्सन यांनाही न सोडवता आलेला नेदरलँडचा प्रश्नही नव्या पंतप्रधानांना मार्गी लावावा लागेल. ब्रेक्झिट नंतर नेदरलँडची भूमिका काय असावी हा प्रश्न आजही अनिर्णित आहे. त्याबाबत नवे पंतप्रधान कसा तोडगा काढतात हे पहावे लागेल.

एकंदर ब्रिटनमधील सत्तानाट्याचा सारांश पाहिल्यास, राजकारणातील व्यक्तिगत चारित्र्य किती महत्त्वाचे असू शकते हे यातून दिसून आले आहे. त्याचबरोबर पक्षांतर्गत झालेला उठाव हा इंग्लंडमधील लोकशाही अधिक सदृढ करण्यासाठी टाकलेले पाऊल आहे असे म्हणावे लागेल.


**– डॉ शैलेंद्र देवळाणकर**

परराष्ट्र धोरण विश्लेषक, मुंबई


•••

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट पर्यंतचे उपक्रम :-**

**२९ जुलै २०२२ - दीप अमावस्या**

आषाढ महिन्यातील अमावस्या दीप अमावस्या म्हणून साजरी करण्यात येते. आपल्याला प्रकाश देणाऱ्या दिव्याची पूजा या दिवशी केली जाते. कंदील, पणती पासून भ्रमणध्वनीच्या (mobile) दिव्यापर्यंत सर्व दिव्यांची माहिती मुलांना दिली गेली. शुभंकरोती श्लोक म्हणून दिव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

**२ ऑगस्ट २०२२ - नागपंचमी**

श्रावण शुद्ध पंचमी म्हणजे नागपंचमी. शिक्षकांनी धान्य पेरून शेताची प्रतिकृती तयार केली होती. त्यात चिकणमातीचा साप तयार केला होता. सापाला शेतकऱ्याचा मित्र का म्हणतात ते शिक्षकांनी मुलांना सांगितले.

ज्यूनियरच्या मुलांच्या चित्रकलेच्या वहीत शिक्षकांनी काढलेल्या सापाच्या चित्रावर मुलांनी बोटाने ठसेकाम केले. सिनियरच्या मुलांना शिक्षकांनी पिवळ्या रंगाचे सापाचे विविध आकार कापून दिले व त्यावर मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ठसेकाम केले. डोळा व जीभ लावून सापाचे चित्र पूर्ण केले. बत्ताशाचा प्रसाद या दिवशी दिला गेला.

**८ ऑगस्ट २०२२ - फ्रुट सॅलेड - ज्यूनियर के. जी.**

ज्यूनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांना परिसर अभ्यास (project) विषयाअंतर्गत फळांचा परिचय व त्याबद्दल इतर माहिती देण्यात आली. त्याच अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना एक एक फळ स्वच्छ धुऊन आणायला सांगितले होते. शिक्षकांनी सर्व फळे एकत्र करून फळांविषयी माहिती (रंग, त्यातील बिया, इ.) मुलांना सांगितली. नंतर फळे चिरून त्यात चाट मसाला घालून ती एकत्र केली व सर्व मुलांनी फ्रुट सॅलेडचा आस्वाद घेतला.

**१० ऑगस्ट २०२२ - रक्षाबंधन । नारळी पौर्णिमा**

श्रावण महिन्यातील पौर्णिमा आपण नारळी पौर्णिमा म्हणून साजरी करतो. कोळी बांधव हा सण कसा साजरा करतात, आपल्याला समुद्रापासून किती विविध गोष्टी मिळतात याची माहिती मुलांना चित्र प्रक्षेपण यंत्र (projector) व लॅपटॉप याद्वारे दाखवण्यात आली.

रक्षाबंधन म्हणजे भावा-बहिणीच्या नात्याचा सण. सर्व मुलांनी नवीन कपडे परिधान केले होते. सिनियर के. जी. च्या मुलांनी नर्सरी, ज्यूनियर व सिनियर या सर्वांसाठी सोनेरी दोरा व मणी वापरून शिक्षकांच्या सहाय्याने सुंदर राख्या तयार केल्या होत्या. मुला-मुलींनी एकमेकांना राख्या बांधल्या. नारळवडीचा गोड खाऊ मुलांना या दिवशी देण्यात आला.

**१२ ऑगस्ट २०२२ - स्वातंत्र्य दिन**

१५ ऑगस्टला देशभर साजरा होणारा स्वातंत्र्य दिन आम्ही १२ ऑगस्टला साजरा केला. नर्सरी व ज्यूनियरची मुले झेंड्याचे रंग असणारे कपडे घालून आली होती. ज्यूनियरच्या मुलांनी झेंड्याची गाणी म्हटली. तिरंग्याचे रंग वापरून हवेचा फुगा (air balloon) तर सिनियरच्या मुलांनी केक रंगवला होता.

सिनियरच्या मुलांनी भारतातील विविध महान नेत्यांची वेशभूषा केली होती व त्या नेत्यांबद्दल २ ते ३ ओळीत माहितीही सांगितली.

देशभक्तीपर गाणी मुलांना दाखवण्यात आली.

---

जिंकण्याची मजा तेव्हाच येते, जेव्हा सर्वजण तुमच्या हारण्याची वाट पाहात असतात !

**१८ ऑगस्ट २०२२ – गोकुळाष्टमी**

मुलांनी कृष्णाचा वेष तर मुलींनी राधेचा वेष परिधान केला होता. कृष्णजन्म व दहिहंडीची गोष्ट मुलांना सांगण्यात आली. कृष्णाची गाणी मुलांनी गायली. नर्सरी, ज्यूनियरच्या मुलांसाठी बांधलेली हंडी न फोडता उपडी करण्यात आली. दहिकाल्याचा प्रसाद या दिवशी सर्वांना दिला.

नर्सरीच्या मुलांनी हंडीच्या चित्रावर फुले चिकटवून सजावट केली. ज्यूनियरच्या मुलांनी हंडीचे तर सिनियरच्या मुलांनी कृष्णाचे चित्र रंगवले.

''गोविंदा रे गोपाळा'' म्हणत मुलांनी दहिहंडीची मजा अनुभवली.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा (२०२१–२०२२)**

महाराष्ट्र राष्ट्रभाषा पुणे ने फरवरी २०२१ – २०२२ को विभिन्न हिंदी भाषा परीक्षाओं का आयोजन किया था । इन परीक्षाओं में ठाणे के सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल को १००% नतीजा प्राप्त हुआ।

**परीक्षा तथा नतीजों का संपूर्ण विवरण :**

| कक्षा | परीक्षा का नाम | उपस्थित कुल छात्र | विशेष योग्यता | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| पाचवी | बालबोधिनी | २० | १५ | ०३ | ०२ | |
| सहावी | प्राथमिक विभाग | ०४ | | ०२ | ०१ | ०१ |
| सातवी | प्रवेशिका | ०३ | ०१ | ०१ | ०१ | |
| आठवी | सुबोध | ०१ | | ०१ | | |
| | **कुल** | **२८** | **१६** | **०७** | **०४** | **०१** |

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमीचा पहिला कार्यक्रम संपन्न**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमीचा शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या पहिला कार्यक्रम बुधवार दिनांक २९ जून २०२२ रोजी स्टाफ रुममध्ये पार पडला. यावेळी जुनियर कॉलेज सुपरवायझर 'प्रा. टि. जे. शर्मा' यांचा निरोप समारंभ पार पडला. या प्रसंगी बोलताना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी शर्मा सरांना भावी आयुष्याकरता शुभेच्छा दिल्या. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. संगीता दीक्षित यांनी शर्मा सरांच्या हरहुन्नरी आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा ठाकूर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. शेफाली कोंडेवार यांनी केले.

उत्सवमूर्ती प्रा. शर्मा सरांनी आपल्या मनोगतात, 'जोशी बेडेकर महाविद्यालयात सेवा करण्याची संधी मिळाली याचा नेहमीच अभिमान वाटला' असे सांगितले. आपल्या स्वभावातील अवखळ सहजपणाला अनुसरत किस्से रंगवले. संपूर्ण स्टाफ–रुम हास्यविनोदात दंग झाली होती.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रा. रुपेश महाडिक यांच्या मदतीने स्टाफ अकॅडमी प्रमुख प्रा. डॉ विमुक्ता राजे यांनी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

**कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय भेटीचे आयोजन**

जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभागातर्फे दि.०८ जुलै २०२२ रोजी, सकाळी ११.३० वाजता, तृतीय वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीदरम्यान ग्रंथालय प्रमुख प्रा. नारायण बारसे यांनी विद्यार्थ्यांना

ई-पुस्तक संकल्पना समजावत, विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील सोयी-सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा असे आवाहन केले.

त्यानंतर ग्रंथालय सदस्य श्री. अनिल कांबळे यांनी विद्यार्थ्यांना संगणकीय प्रणालीद्वारे पुस्तक उपलब्धता तपासणे, सोबत पुस्तक विभागाची देखभाल, विषयवार मांडणी, पुस्तकांची अद्ययावत याबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

त्यानंतर ग्रंथालयातील सदस्य श्री. आनंद आरकडे यांनी विद्यार्थ्यांना संदर्भ विभागाची संपूर्ण माहिती दिली. तसेच तृतीय वर्ष कला शाखेतील अंध विद्यार्थी दिनेश याने ग्रंथालयातील ब्रेल लिपी विभागातील उपलब्ध ब्रेल लिपी पुस्तकाचे वाचन करीत सर्वांना प्रात्यक्षिक दाखविले. सहाय्यक ग्रंथपाल मनिषा पाटील यांनीही विद्यार्थ्यांना ग्रंथालयात आवश्यक असणारे पुस्तक उपलब्ध करून दिले जाईल याची खात्री देत जास्तीत जास्त ग्रंथालयाचा उपयोग करून घ्यावा हे समजावत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रंथालय प्रमुख प्रा. नारायण बारसे सर यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी ई - पुस्तक वाचन संदर्भातील लेख डाऊनलोड केला आणि महाविद्यालयाने दिलेल्या या सुविधांचा जास्तीत जास्त ज्ञानार्जनासाठी उपयोग करण्याचा संकल्प केला. यावेळी प्रा. रुपेश महाडिक, प्रा. राजश्री माने - जाधव हे दोघे विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने दिनांक आठ जुलै दोन हजार बावीस रोजी 'अनुवाद एक करिअर ऑप्शन' या विषयावर BARC चे माजी वैज्ञानिक अधिकारी श्री नरेंद्र गोळे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. हा संपूर्ण कार्यक्रम BRIMS च्या पाणिनी सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला जोशी बेडेकर महविद्यालयाच्या डॉ. विमुक्ता राजे, डॉ. प्रशांत धर्माधिकारी, मानसी जंगम या प्राध्यापकांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागाचे ६० विद्यार्थी उपस्थित होते.

ज्येष्ठ अनुवादक नरेंद्र गोळे यांनी 'अनुवाद-एक करिअर ऑप्शन' या विषयी सादरीकरण करत उत्तम व्याख्यान दिले. सादरीकरणात अनेक महत्त्वाच्या विषयांना त्यांनी हात घातला. त्यात विविध उदाहरणे देत त्यांनी 'भाषांतर सेवा' हा विषय आपण आपला करियर पर्याय कसा बनवू शकतो याचे महत्त्व सांगितले. आपण आताच्या या आधुनिक व तंत्रज्ञान विकसित जगात अनेक गोष्टी सोप्या करून घेतल्या आहेत. जसे की, गूगल भाषांतरच्या मदतीने आपण कोणतेही शब्द आपल्याला हव्या त्या भाषेत भाषांतर करू शकतो. इंग्रजी शब्द आपण आता आपलेसे करून घेतले आहेत. परंतु आपली मातृभाषा मराठी ही किती उत्तम आहे याची महतीही त्यांनी सांगितली. गोळे सरांनी व्याख्यानात काही मजेशीर कविता, संस्कृत श्लोक यांचीही उदाहरणे दिली.

तसेच, भारतीय भाषेचे स्थानिकीकरण, त्याचे कौशल्य हे आपल्या भारतीय लोकांनीच विकसित केले आहे. बरेचसे शब्द-संग्रह, शब्दकोश उपलब्ध आहेत; परंतु ते आता अद्ययावत करण्याची गरज आहे, हेही त्यांनी सांगितले. व्याख्यानाची सांगता करता त्यांनी एक उत्तम उदाहरण दिले ''भाषा ही तरुण स्त्री सारखी आहे. ती सुंदर असली की प्रामाणिक असतेच, आणि प्रामाणिक असली तर ती सुंदर नाही'' असा उपहास करत भाषेची वळणदार शैली हास्यास्पद रुपात मांडली. अशा प्रकारे आपण अनुवादाकडे एक करिअर ऑप्शन म्हणून देखील बघू शकतो हा विश्वास आपल्या व्याख्यानातून सर्वांना दिला.

---

कार्यक्रमाअंती विशेष प्रश्नोत्तरांची फेरीदेखील घेण्यात आली. त्याला देखील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

**गुरुपौर्णिमा उत्सव –२०२२**

विद्या प्रसारक मंडळच्या जोशी–बेडेकर महाविद्यालय (स्वायत्त), ठाणेच्या 'सर्ज' या माजी विद्यार्थी संघटनेने १३ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात गुरुपौर्णिमा उत्सव – २०२२ साजरा केला. या कार्यक्रमास डॉ. स्मिता भिडे (गणित व स्टॅटिस्टिक विभागाच्या माजी प्रमुख व माजी उपप्राचार्या, जोशी–बेडेकर महाविद्यालय) या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मानसी जंगम यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या स्वागत – सत्कारानंतर सर्जचे खजिनदार श्री. राजेंद्र साळवी यांनी सर्जच्या विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती उपस्थितांना दिली. या उपक्रमांमध्ये सर्ज तर्फे कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ५० गेस्ट लेक्चर्स, डिझास्टर मॅनेजमेंट संबंधी कोर्सचा अभ्यासक्रमातील समावेश, सर्जतर्फे कॉलेजला रु २,५०,०००/– तसेच विद्याप्रसारक मंडळास रु १,५०,०००/– ची देणगी देण्यात आली. त्यानंतर सर्च या संस्थेतर्फे पार पडणाऱ्या अनेक उपक्रमांची देखील माहिती देण्यात आली.

त्यानंतर प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेल्या गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सर्ज करीत असलेल्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता भिडे यांनी गुरु–शिष्य नाते यांच्यातील पारंपरिक आणि आधुनिक नातेसंबंधावर आपले विचार मांडले. तसेच तंत्रज्ञान हे तरुण पिढीचा आधुनिक गुरू आहे याचाही त्यांनी प्रामुख्याने उल्लेख केला.

प्रमुख अतिथी डॉ. स्मिता भिडे, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य, समन्वयक, शिक्षक वृंद, सर्ज सदस्य, बीएमएमचे विद्यार्थी आणि स्वयंसेवक या सर्वांचे सर्ज संघटनेने आभार मानले.

जोशी–बेडेकर स्वायत्त महाविद्यालयात जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागातर्फे प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली, द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे या वर्षी देखील 'गुरुपौर्णिमा' हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावर्षी या कार्यक्रमाची संकल्पना 'निसर्ग' ही ठेवण्यात आली होती. गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत घेत आपल्या गुरूंसाठी कागदी फुले, तोरणे आणि रांगोळ्या काढल्या होत्या. संकल्पनेनुसार आकर्षक चित्रे देखील काढली होती.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य व समन्वयक डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, डॉ. विमुक्ता राजे, प्रा. मानसी जंगम व प्रा. स्नेहील झनके उपस्थित होते. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी वेदिका कंटे हिने सूत्रसंचालनाची धुरा सांभाळत उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला तृतीय वर्ष व पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे सरांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगत सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आपल्या भावना व्यक्त करत त्यांचे गुरुपौर्णिमेशी असलेल्या नात्याबद्दल सांगितले. उपप्राचार्य डॉ महेश पाटील, स्नेहील झनके, डॉ विमुक्ता राजे व मानसी जंगम यांनी देखील सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मार्गदर्शना दरम्यान काही आठवणींतील क्षण सांगत प्राध्यापक व विद्यार्थी भावूक झाले.

द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी हर्षदा वीरकर, सृष्टी राऊत, तनुजा सोनावणे, वंदना धुर्वे यांनी निसर्गातील गुरू – झाडे, पक्षी, इंद्रधनुष्य, सूर्य हे विषय घेत गुरू

शिष्यांच्या नात्याचे महत्त्व सांगितले. तृतीय वर्षातील विद्यार्थी मृण्मयी समेळ, आदित्य पंडित, इंग्लिश जनसंज्ञापन व पत्रकारिता विभागातील श्रावणी राऊळ आणि पदव्युत्तर विद्यार्थिनी मैथिली फडके यांनी देखील आपल्या गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपल्या भावना मांडल्या. या गुरुपौर्णिमा कार्यक्रमाची सांगता मेघा जोंधळे हीने सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांचे आभार मानले.

जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे २३ जुलै २०२२ लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त ते १ ऑगस्ट २०२२ लोकमान्य टिळकांच्या स्मृतिदिनापर्यंत 'लोकमान्य टिळकांच्या विचारांचा जागर' व्हावा आणि युवा पिढीमध्ये लोकमान्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा या हेतूने २३ जुलै २०२२ रोजी लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त मुंबई विद्यापीठाच्या 'लोकमान्य टिळक संशोधन व अभ्यास केंद्र आणि जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालय यांच्या संयुक्त' विद्यमाने लोकमान्य टिळक यांच्या विविध पैलूंवर आधारित लघु व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. ही लघुव्याख्यानमाला ऑनलाईन स्वरूपात यूट्यूबच्या माध्यमातून प्रसारित केली गेली.

एक लघु व्याख्यानमाला दहा ते पंधरा मिनिटांची होती, या लघु व्याख्यानमालेच्या माध्यमातून लोकमान्य टिळकांच्या विविध पैलूंना स्पर्श करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माननीय प्र. कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

**पेपर फ्लॉवर मेकिंग वर्कशॉप**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या जीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांनी दिनांक २५ जुलै २०२२ रोजी विद्यार्थ्यांसाठी पेपर फ्लॉवर मेकिंग कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी कागदाची फुले बनवण्याची कला आणि आपल्या कौशल्याद्वारे एक उद्योजकवृत्ती दाखवली. या कार्यशाळेसाठी एकूण बावीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेसाठी शर्वरी गोरेगावकर या प्रमुख पाहुण्या उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रम प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि DLLE स्वयंसेवक, तसेच शिक्षक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने उत्तमरित्या पार पडला.

**विद्यार्थ्यांसाठी पावसाळी काव्यमैफिलीचे आयोजन**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या मराठी आणि साहित्य विभागाने बुधवार दिनांक २७ जुलै २०२२ रोजी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शन आणि प्रोत्साहनाने 'पावसात चाले नाव कवितांची' या पावसाळी काव्यमैफिलीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. रुपेश महाडिक आणि प्रा. राजश्री माने-जाधव यांनी केले होते.

या काव्य मैफिलीत द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थ्यांनी आपला सहर्ष सहभाग दर्शवित कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या पावसाळी कवितांचे बहारदार सादरीकरण केले. बऱ्याच विद्यार्थ्यांनी यावेळी स्वरचित कवितांचे देखील सादरीकरण केले.

केंद्र सरकारच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी उपक्रमांतर्गत 'हर घर तिरंगा' या उपक्रमाच्या 'कोंकण विभागीय सुकाणू समिती' च्या सदस्यपदी, तसेच 'ठाणे जिल्ह्याच्या समितीच्या अध्यक्षा' म्हणून जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांची निवड झाली आहे. त्याबद्दल आदरणीय प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन.

**विद्यार्थ्यांसाठी 'ऋतुमानानुसार संतुलित आहार' या विशेष व्याख्यानमालेचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे येथील

जिमखाना/स्पोर्ट्स अकॅडमी आणि विवेकानंद स्टडी सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता ‘ऋतुमानानुसार संतुलित आहार’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपद उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे सर यांनी भूषविले, तर सुप्रसिद्ध योग चिकित्सक आणि आहार तज्ज्ञ स्वार्थी खाडिलकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिक्षा कुलकर्णी यांनी केले, तर आभारप्रदर्शनाची धुरा डॉ.शिरीष पाटील यांनी सांभाळली. तर या कार्यक्रमासाठी ९९ विद्यार्थी, १४ प्राध्यापक आणि इतर महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ऊर्मिला शेटवे आणि डॉ. प्रमोद खराटे यांनी केले. त्यानंतर उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी ऋतुमानानुसार आपल्या आहारात बदल करायला हवा हे समजावले, सोबतच आपण स्वतः योग्य आहार आणि नियोजन करून वजन कमी केल्याचे प्रत्यक्ष प्रमाण असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचसोबत विद्यार्थ्यांसाठी हेच योग्य वय असल्याचे निदर्शनात आणून याच सुत्राचा वापर करून चिरतरुण राहू शकतो याची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली.

त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या आरती खाडिलकर यांनी विद्यार्थ्यांना आहाराबद्दल पुढील गोष्टी सांगितल्या :

- निरोगी जीवन जगण्यासाठी झोप, व्यायाम (यात योगा, प्राणायाम), मानसिक स्थैर्य, संतुलित आहार या चतु:सूत्रीचा अवलंब करायला हवा.
- सात्विक आहाराचा अन्नात समावेश करायला हवा, कारण आपण ज्या प्रकारचे अन्न खातो, त्यानुसार सत्त्व, रज, तम अशा प्रकारचे आपल्या व्यक्तिमत्त्वात बदल होत असतात.
- अनेक जणांची ओरड असते की, आम्ही कमी जेवतो, वजन कमी करण्याचा प्रयत्न करतो, पण प्रत्यक्षात कोणत्या प्रकारचे अन्न खातो यालाही महत्त्व असल्याचे निदर्शनास आणून दिले.
- आहारात किती कर्बोदके, प्रोटीन, उष्मा देणारे पदार्थ असावेत याची पिरॅमिड दर्शविणारी सविस्तर माहिती देणारी PPT माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर सादर केली.
- विद्यार्थ्यांनी व्यायाम शाळेत जाऊन वे-प्रोटीन घेण्यापेक्षा घरातील सात्विक आहार ज्यात प्रोटीन असेल, फायबर असेल, कॅल्शियम, आयर्न, किती प्रमाणात फॅट्स असावेत.
- ऋतूनुसार आहारात विविध गोष्टी भारतीय मसाले, हळद, तुळस याचा वापर असायला हवा.

एकूणच आरती खाडिलकर यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधक, पण तितक्याच सहज शैलीमध्ये अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेत उत्तम प्रतिसाद देखील नोंदविला.

**महाविद्यालयाच्या कला विभागातर्फे ‘प्रेमचंद जयंती’ उत्सवाचे आयोजन**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या कला शाखेतील हिंदी विभागाने कादंबरी सम्राट प्रेमचंदजी यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी, ३० जुलै २०२२ रोजी ‘प्रेमचंद जयंती उत्सव’ आयोजित केला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड आणि भाषा कौशल्ये रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी तृतीय वर्षाच्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी

---

सोबत कितीही लोक असू द्या, शेवटी संघर्ष स्वतःलाच करावा लागतो.
म्हणून अडचणीत आधार शोधू नका. स्वतःलाच भक्कम बनवा.

प्रेमचंद यांच्या निवडक कथा त्यांच्याच शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच कथाकथनाच्या या कार्यक्रमाद्वारे हिंदी भाषा आणि साहित्याच्या विद्यार्थ्यांनी कथाकार प्रेमचंद आणि त्यांची आदर्शवादी आणि वास्तववादी विचारधारा आत्मसात करण्याचा, भारतीय समाजाची व्यापक परिस्थिती समजून घेण्याचा आणि कथेला अभिव्यक्ती देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जयश्री सिंग यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांनी सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची भूमिका मांडली. त्यानंतर विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे यांनी भारतीय साहित्यातील प्रेमचंदजींची उपस्थिती अधोरेखित करून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला प्रोत्साहन दिले. हा कार्यक्रम कला विभागाच्या वर्गांमध्ये आयोजित करण्यात आला होता.

**आजादी का अमृत महोत्सव अन्तर्गत संस्कृत सप्ताह**

डॉ. सौ. सुचित्रा नाईक प्राचार्या आणि अध्यक्षा ठाणे जिल्हास्तरीय हर घर तिरंगा समन्वय समिती, डॉ. दीपक साबळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख तसेच समन्वयक, हर घर तिरंगा उपक्रम, ग्रंथपाल नारायण बारसे, सल्लागार हर घर तिरंगा उपक्रम यांच्या मार्गदर्शनाने ७५ वा स्वातंत्र्य अमृत महोत्सवान्तर्गत संस्कृत विभागाने संस्कृत दिनाचे औचित्य साधनू दि. ११/०८ ते २०/०८/२२ पर्यंत संस्कृत सप्ताहाचे आयोजन केले होते. या महोत्सवात महाविद्यालयीन आणि आंतर महाविद्यालयीन मिळून एकूण ५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

**गुरुवार, दि. ११ ऑगस्ट २०२२ –** सप्ताहाचे उद्घाटन गीतगायन स्पर्धेने झाले. आंतर महाविद्यालयीन विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. प्रथम दोन विजेते महाविद्यालयीन असून, इतर दोन विजेते सोमय्या आणि राष्ट्रीय संस्कृत संस्थानाचे होते. प्रा. सुमित कुमार झा यांनी स्पर्धेच्या निर्णायकाची भूमिका पार पाडली.

**दि. १२/०८/२०२२, शुक्रवार–** कथाकथनस्पर्धा, वार्ता वाचनस्पर्धा (News Reading) यात एकूण १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रत्येकी तीन विद्यार्थी विजेते घोषित करण्यात आले. प्रा. कोमल बापट यांनी स्पर्धेच्या निर्णायिकेची भूमिका पार पाडली.

**दि. १३/०८/२०२२ शनिवार –** वक्तृत्व स्पर्धा – यात एकूण १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. प्रत्येकी तीन विद्यार्थी विजेते घोषित करण्यात आले. प्रा. निशा वर्तक यांनी स्पर्धेच्या निर्णायिकेची भूमिका पार पाडली.

**दि. १७/०८/२०२२ बुधवार –** सुभाषित पठण स्पर्धा, यात एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता प्रत्येकी तीन विद्यार्थी विजेते घोषित करण्यात आले. प्रा. सुमित कुमार झा यांनी स्पर्धेच्या निर्णायकाची भूमिका पार पाडली.

**दि. १८/०८/२०२२ गुरुवार –** महाविद्यालय वारी, यात विभागाचे सर्वच विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. स्वाती भालेराव आणि प्रा. श्रेया मोघे यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील वाचनालय, Research क्षेत्र, Computer Lab, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांची भेट, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांची भेट, जिमखाना, कार्यालय आणि महाविद्यालयाचा संपूर्ण परिसराचे दर्शन विद्यार्थ्यांना करविण्यात आले. यात जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**दि. १८/०८/२०२२ गुरुवार –** चित्रकला स्पर्धा यात एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यात तीन विद्यार्थी विजेते घोषित करण्यात आले. प्रा. प्रतीक्षा कुलकर्णी यांनी स्पर्धेच्या निर्णायिकेची भूमिका पार पाडली.

**दि. १९/०८/२०२२ शुक्रवार –** स्क्रीनिंग – माहितीपूर्ण व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

**दि. २०/०८/२०२२ शनिवार –** स्मरणक्रीडा (Memory

Game) – एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यात एक जण विजेता घोषित करण्यात आला. प्रा. प्रतीक्षा कुलकर्णी यांनी स्पर्धेच्या निर्णायिकेची भूमिका पार पाडली.

**दि. २०/०८/२०२२ शनिवार –** प्रश्नमंजुषा (Quiz) एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यात एक जण विजेता घोषित करण्यात आला. प्रा. चेतना ठोंबरे यांनी स्पर्धेच्या निर्णायिकेची भूमिका पार पाडली.

**दि. २०/०८/२०२२ शनिवार –** समापण– प्रा. स्वाती भालेराव, प्रा. श्रेया मोघे आणि प्रा. कोमल बापट यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाचा समारोप करण्यात आला.

यात रुईया महाविद्यालय, वझे केळकर महाविद्यालय, राष्ट्रीय संस्कृत संस्थान, बांदोडकर कनिष्ठ महाद्यिालय, जोशी बेडेकर कनिष्ठ– वरिष्ठ महाविद्यालय आणि श्रीरंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला होता.

संस्कृत सप्ताह यशस्वी होण्यासाठी डॉ. सौ. सुचित्रा नाईक, प्राचार्या आणि अध्यक्षा ठाणे जिल्हास्तरीय हर घर तिरंगा समन्वय समिती, डॉ. दीपक साबळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, तसेच समन्वयक, हर घर तिरंगा उपक्रम, ग्रंथपाल नारायण बारसे, सल्लागार हर घर तिरंगा उपक्रम, तसेच उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, सर्व समन्वयक, सर्व प्राध्यापक वृंद आणि विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोलाचे साहाय्य आणि मार्गदर्शन केले. प्रा. स्वाती म. भालेराव, संस्कृत विभाग प्रमुख यांनी संयोजन केले.

**आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी सादर केलेले कार्यक्रम**

विद्या प्रसारक मंडळाच्या के ग जोशी कला आणि ना गो बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय, ठाणे जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभाग व कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सवा अंतर्गत प्रसार माध्यमांचा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील प्रवास आणि स्वातंत्र्यवीरांचे शौर्य पोस्टर प्रदर्शन सोहळा शुक्रवार आणि शनिवार १२ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला होता.



तंत्रज्ञानाने घेतलेल्या हनुमान उडीने अनेक गोष्टी कवेत घेतल्या आहेत. त्यामुळेच ५ मुख्य माध्यमे म्हणजेच वृत्तपत्र, कॅमेरा, रेडिओ, टीव्ही आणि सर्वात महत्त्वाचं माध्यम म्हणजे मोबाईल या सर्वांचा १९४७ ते २०२२ पर्यंतचा प्रवास, तसेच स्वातंत्र्याच्या चळवळीत मोलाचे असणारे योगदान, तसेच सर्व स्वातंत्र्यसैनिक असे प्रदर्शन आयोजित केले होते.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, तसेच उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्या संगीता दीक्षित, उपप्राचार्य सुभाष शिंदे, ग्रंथपाल नारायण बारसे यांचे स्वागत करून सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

द्वितीय वर्षाचे रोहित शेडगे आणि वैष्णवी शिंदे ह्या विद्यार्थ्यांनी वृत्तपत्र ते ई–पेपर पर्यंत प्रवास स्पष्ट

केला. निशान मढवी आणि प्रबुद्ध कांबळे यांनी मोठा कॅमेरा ते स्मार्ट फोनमधील कॅमेरा हा प्रवास सर्वांसमोर मांडला. हर्षदा वीरकर आणि मिताली म्हात्रे यांनी मिळून रेडिओ ते पॉडकास्ट हा बदल सांगितला. टीव्ही ते मोबाईल टीव्हीचा प्रवास तनुजा सोनावणे आणि सृष्टी राऊत यांनी उलगडला. सर्वात महत्त्वाचे माध्यम असणारा मोबाईल याबाबतची माहिती समीक्षा चौधरी आणि सिद्धेश दाभाडे यांनी दिली. या संपूर्ण प्रदर्शन कार्यक्रमाची संकल्पना आणि आयोजन प्राध्यापिका डॉ. विमुक्ता राजे यांनी केले होते.

उद्‌घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या, 'प्रसार माध्यम ही विस्तवासारखी असतात. ज्या प्रमाणे त्यांचा वापर आपण करू त्यानुसार त्यांचा उपयोग होत असतो. ७५ वर्षांमध्ये माध्यमांमध्ये झालेला बदल हा सर्वव्यापी आहे'. एक पोकळी भरून काढण्यासाठी कार्यक्रम न करता विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रम आयोजित केला.

ह्या प्रदर्शनास सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला, तसेच उत्तम उपक्रम असा अभिप्राय नोंदवला.

या वेळी सूत्रसंचालन द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी मेघा जोंधळे हिने केले. या कार्यक्रमास द्वितीय वर्षाचे विद्यार्थी अथर्व देवरे, भाग्यश्री नागावकर, स्वाती कदम, वेदिका कुंटे आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी तेजस्वी पाटील, अविनाश शिंदे स्वयंसेवक म्हणून लाभले होते.

अशा प्रकारे आझादी का अमृत महोत्सव 'हर घर तिरंगा' योजने अंतर्गत विद्यार्थ्यांनी कार्यक्रम पार पाडला.

**चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाचा समारोप**

**जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम**

ठाण्यातील जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या फिल्म सोसायटी, जनसंज्ञापन विभाग व फेडरेशन फॉर फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसीय चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ संतोष पाठारे यांच्या उपस्थितीत दिनांक ३० ऑगस्ट २०२२ दिवशी या अभ्यासक्रमाचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश पाटील व फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ प्रशांत धर्माधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. महेश पाटील यांनी या अभ्यासक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी म्हणाले की, 'उत्तमोत्तम चित्रपट विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कारक्षम वयामध्ये पाहिले तर त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. सजग व रसिक प्रेक्षक घडवणे हा फिल्म सोसायटीच्या कामाचा गाभा आहे'.



समारोप सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. संतोष पाठारे यांनी आपल्या भाषणात चित्रपट रसास्वादाची भूमिका विशद केली. केरळ व गोव्यामध्ये भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. चित्रपट पाहताना ध्वनी, पटकथा, प्रकाश योजना, संवाद, दिग्दर्शन इत्यादी सर्व विषयांकडे लक्ष दिले पाहिजे. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे उत्तम सिनेमा होय असे ते म्हणाले.

या दहा दिवस अभ्यासक्रमामध्ये ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व लेखक श्री गणेश मतकरी, ज्येष्ठ ध्वनी

संयोजक मंदार कमलापूरकर, दिग्दर्शक निलेश कुंजीर व फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडियाचे खजिनदार व चित्रपट अभ्यासक डॉ संतोष पाठारे यांनी चित्रपट रसास्वादाची मूलतत्त्वे, चित्रपटातील ध्वनि संयोजन, समांतर सिनेमा, जागतिक चित्रपटातील नवे प्रवाह इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमात अनेक उत्तम लघुपट व चित्रपट दाखवण्यात आले. डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी या संपूर्ण अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहिले. ७० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला सहभाग नोंदवला होता. सहभागी विद्यार्थ्यांना याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. काही निवडक विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांमधून आपल्याला काय लाभ झाला, काय नवीन शिकायला मिळालं यावर आपले थोडक्यात मत मांडले. या प्रकारचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असतात असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रम**

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

ठाणे महानगरपालिका, एनसीसी आर्मी बॉईज आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त समूह राष्ट्रगीत गायन घेण्यात आले. यानिमित्ताने सेल्फी पॉइंटचे उद्घाटन देखील करण्यात आले होते.

यामध्ये सर्व शिक्षक व एनएसएस च्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमात १०६ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त बा. ना. बांदोडकर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले, याच बरोबर तिरंगा वाटप करण्यात आले. यात सर्व शिक्षक व एनएसएसच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. आजच्या उपक्रमात १०२ विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त ठाणे मध्यवर्ती कारागृह व पोलिस कमिशनर कार्यालय येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात सर्व शिक्षक व एनएसएस च्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमात २३ विद्यार्थी उपस्थित होते.




दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे प्रभात फेरी घेण्यात आली आणि नर्सिंग कॉलेज मध्ये रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात एनएसएसच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमात ९ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त मुंबई विद्यापीठ, कालिना कॅम्पस येथे प्रभात फेरी घेण्यात आली. यात एनएसएसच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमात १० विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत हर घर तिरंगा अभियानाचे निमित्त येऊर आणि बांदोडकर कॉलेज कॅम्पस येथे वृक्षारोपण करण्यात आले. यात सर्व शिक्षक आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमात ४८ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉक्टर विजय बेडेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले तसेच प्रभात फेरीचे आयोजन देखील करण्यात आले होते. ध्वजवंदन झाल्यानंतर डॉ विजय बेडेकर व विद्या प्रसारक मंडळ मंडळाचे पदाधिकारी यांनी बांदोडकर महाविद्यालयातील विनाअनुदानित विभागातील शिक्षकांशी संवाद साधला.

१६ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे राष्ट्रभक्ती पर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम 'दिल है हिंदुस्तानी' होती. यामध्ये नृत्य, गाणी यांचा समावेश होता, तसेच सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे उत्सव सेवेंटी फाईव्ह यामध्ये आपला सहभाग नोंदवला.

१७ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर पथनाट्य सादर केले, तसेच महाराष्ट्र सरकारच्या आदेशानुसार या दिवशी देशभक्तीपर आधारित चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला.

**राष्ट्रीय छात्र सेना**

१२ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय स्तरावरील पुनीत सागर अभियानामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या सदस्यांनी समुद्र व समुद्र किनारास्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त वितरित केलेले झेंडे राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याकरता १८ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी मोहीम राबवून घरोघरी जाऊन जमा केले.

१७ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र शासनाची स्टार्ट अप यात्रा मोबाईल व्हॅनचे उद्घाटन महाराष्ट्र स्टेट इनोवेशन सोसायटी तर्फे करण्यात आले.

**पदव्युत्तर नवीन अभ्यासक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे येथे एम. एस. सी. डाटा सायन्स व एम. एस. सी. क्लीनिकल सायकॉलॉजी हे दोन पदव्युत्तर नवीन अभ्यासक्रम २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आले आहेत.

**योगा व हॅप्पीनेस अभ्यासक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे वइस्कॉन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने योगा व हॅप्पीनेस या विषयावर ३ ऑगस्ट २०२२ ते ६ ऑगस्ट २०२२ रोजी चार दिवसीय अभ्यासक्रम संपन्न झाला. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन श्री त्रिविक्रम बेंद्रे, खजिनदार, विद्या प्रसारक मंडळ आणि प्राचार्य डॉक्टर मोजेस कोलेट यांच्या हस्ते झाले. या संपूर्ण अभ्यासक्रमाला डॉ उरुक्रमा गौरंग प्रभुजी व त्यांच्या टीमने चारही दिवस मार्गदर्शन केले. प्रथम दिवशी Facing Challenges in Life : The Bhagvadgita way, दुसऱ्या दिवशी Overcoming Distractor, तिसऱ्या दिवशी Law of Karma चौथ्या दिवशी Yoga for Modern Age या विषयावर या प्रशिक्षण देण्यात आले. दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.





**क्रांतीसिंह नाना पाटील जयंती**

दिनांक ३ ऑगस्ट २०२२ रोजी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागातर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या वरील माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले.

**पावसाळी गिर्यारोहण**

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, सांघिक कामगिरी व साहसी गोष्टी करण्याकडे प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने लोहगड येथे गिर्यारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. संख्याशास्त्र व गणित विभागातर्फे ३ ऑगस्ट २०२२ रोजी पावसाळी गिर्यारोहणाचा अनुभव छत्तीस विद्यार्थ्यांनी लोहगड येथे जाऊन घेतला. कु. सुमैया शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा ट्रेक संपन्न झाला.



**रक्तदान शिबिर**

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने २६ जुलै २०२२ व ६ ऑगस्ट २०२२ रोजी रक्तदान शिबिर बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे आणि बेडेकर हॉस्पिटल ठाणे या दोन ठिकाणी आणि यशस्वीरित्या पार पडले. ६ ऑगस्ट २०२२ रोजी रक्तदान शिबिरात ४३ बाटल्या डॉ बेडेकर हॉस्पिटल व ५२ बाटल्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालय अशा एकूण ९५ रक्त बाटल्या जमा करण्यात आल्या. तर ६६ रक्त बाटल्या जमा करण्यात आल्या. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कैलासवासी वामनराव ओक रक्तपेढी तर्फे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला रक्तदान शिबिरात सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल मानचिन्ह प्रधान करण्यात आले.

**स्वच्छता मोहीम**

१० ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली.

**विद्यार्थ्यांचे यश**

राष्ट्रीय सेवा योजनेचे सभासद द्वितीय वर्ष विज्ञान शाखेचा विद्यार्थी रोहित म्हात्रे यांनी एस. एस. टी. कला, वाणिज्य महाविद्यालयातर्फे आयोजित निबंध स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला.

द्वितीय वर्ष विज्ञान शाखेचा विद्यार्थी श्री आदित्य भट याला राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळाले.

मुंबई विद्यापीठाच्या युवक महोत्सवामधील जिल्हास्तरीय फेरीमध्ये श्लेषा बोके या विद्यार्थिनीला शास्त्रीय नृत्य मध्ये द्वितीय पारितोषिक, तर अथर्व बागडे या विद्यार्थ्याला तबला वादनात तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

अमोल चौगुले या विद्यार्थ्याने ठाणे महापालिकेत आयोजित केलेल्या वक्तृत्वस्पर्धेत जिल्हास्तरीय पातळीवर द्वितीय क्रमांक पटकावला.

कुमारी कु इद्रिशा हुदा या विद्यार्थिनीने बी एन एन कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयाने आयोजित

केलेल्या आंतर महाविद्यालयीन कॉफी चित्रकला स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावले.

लोक न्यूज चॅनल तर्फे ६४ कला या विषयावर आधारित कार्यक्रमांमध्ये मेकिंग ऑफ गणेश आयडॉल या कार्यक्रमाकरिता कुमारी किन्नरी लोंढे आणि कुमारी अपूर्वा राठोड यांना आमंत्रित करण्यात आले होते

आंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने मुंबई विद्यापीठाचा ५५ वा युवक महोत्सवाची जिल्हास्तरीय फेरी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात संपन्न झाली. यामध्ये १३ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व ३७ महाविद्यालयांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवला.

**शिक्षकांचे यश**

दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी गणित विभागाच्या शिक्षिका सुदर्शना चव्हाण यांनी २१.१ मीटर अंतर जाऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले. आजादी का अमृत महोत्सव या अंतर्गत या धाव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**राष्ट्रीय ग्रंथपाल दिन**

१२ ऑगस्ट हा दिवस भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ शियाली रंगनाथन यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथालय विभागातर्फे डॉ एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन आणि त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन ग्रंथालय विभागात भरवण्यात आले होते.



**सामाजिक बांधिलकी उपक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे ६० किलो प्लास्टिक कचरा जमा करून त्याला पुनर्प्रक्रियेकरिता Bisleri International Limited येथे पाठवण्यात आला. या गोष्टीची दखल ठाणे महानगरपालिकेतर्फे घेण्यात आली व बांदोडकर महाविद्यालयाला प्रशंसापत्र प्रदान करण्यात आले.

कचरा व्यवस्थापन याबद्दल जागरूकता करण्याच्या निमित्ताने काचेच्या वस्तूंचा कचरा Glass Waste जमा करणे ही मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये १११ किलो काचेच्या वस्तू जमा करून पुनर्प्रक्रियेकरता पाठविण्यात आल्या. लेफ्टनंट बिपिन धुमाळे, मराठी विभाग व सौ. शुभांगी पिंपरे, रसायनशास्त्र विभाग यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले.

पर्यावरण शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी वनशक्ती सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या खारफुटी स्वच्छता मोहीम मध्ये (Mangrove Cleanliness Drive) भांडूप पंपिंग स्टेशन येथे सक्रिय सहभाग नोंदवला.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने Make Your Clay Ganapati या विषयावर पतंजली योग केंद्रामध्ये २६ ऑगस्ट २०२२ रोजी कार्यशाळा संपन्न झाली.

१८ ऑगस्ट २०२२ रोजी वनस्पतिशास्त्र, पर्यावरण शास्त्र व जैवविविधता विभाग यातील विद्यार्थ्यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलात वृक्षारोपण केले.

पर्यावरण दक्षता मंडळाचे तर्फे बांदोडकर महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांना राखी बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. या चार विद्यार्थ्यांनी घोडबंदर रोड येथील सरस्वती विद्यालय येथे जाऊन ३५० विद्यार्थ्यांना राखी बनवण्याचे प्रशिक्षण दिले.

सोबती या सेवाभावी संस्थेतर्फे बनवण्यात आलेल्या राख्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सर्व सामान्य लोकांमध्ये विकण्यास मदत केली व एकूण पंधरा हजारहून अधिक किंमतीच्या राख्या विकण्यामध्ये विद्यार्थी यशस्वी झाले. विद्यार्थ्यांच्या या सहकार्याबद्दल बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला सोबती संघटनेतर्फे प्रशस्तीपत्र देण्यात आले.

**उद्घाटनपर सत्र**

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता उद्घाटनपर सत्र २४ ऑगस्ट २०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते.

२५ ऑगस्ट २०२२ रोजी अकरावीच्या विद्यार्थ्यांकरिता उद्घाटनपर सत्र थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते.

Knimbus **प्रशिक्षण सत्र**

दिनांक २४ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२२ या कालावधीत ग्रंथालय विभागातर्फे Knimbus`m ऑनलाइन प्लॅटफॉर्म बद्दल जागृती करण्याकरता विद्यार्थ्यां करता प्रशिक्षण सत्रे मायक्रोसॉफ्ट टीमच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपलब्ध इलेक्ट्रॉनिक पुस्तके, नियतकालिके व अन्य इलेक्ट्रॉनिक माध्यमातील स्रोतांची माहिती होण्याकरिता ही प्रशिक्षण सत्रे प्रथम वर्ष द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना करता आयोजित करण्यात आली होती.

**Innovation corner**

"Innovation corner" समितीतर्फे २५ ऑगस्ट २०२२ रोजी डॉ. सुधाकर आगरकर, यांचे "Edward Jenner : An Innovative Scientist" या थोर वैज्ञानिकावर व्याख्यान आयोजित केले होते.

**JBNB: - Multidisciplinary Journal**

संशोधन समितीतर्फे JBNB : Multidisciplinary Journal या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन २९ जुलै २०२२ रोजी डॉक्टर सौ. ऊर्मिला कुमावत सहाय्यक प्राध्यापक वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या हस्ते संपन्न झाले.

**अभ्यास भेट**

२६ ऑगस्ट २०२२ रोजी ५४ पदवी व निष्णात अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि ५ शिक्षकांनी डिपार्टमेंट ऑफ ऑटोमिक एनर्जी यांच्यातर्फे आयोजित Nuclear Reactor या विषयावर आयोजित प्रदर्शनाला भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर येथे भेट दिली.

२७ ऑगस्ट २०२२ रोजी वनस्पतीशास्त्र विभागाच्या द्वितीय व तृतीय वर्ष विज्ञान शाखेचे विद्यार्थी व ६ शिक्षक वीर जिजामाता उद्यान, भायखळा येथे शैक्षणिक सहलीकरिता गेले होते.




तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान विभाग व सूक्ष्म जीवशास्त्र विभागातील आठ विद्यार्थ्यांनी ॲडव्हान्स सेंटर फॉर ट्रीटमेंट रिसर्च अंड एज्युकेशन इन कॅन्सर (ACTREC) येथे २२ ऑगस्ट २०२२ रोजी भेट दिली. या संस्थेतील अद्ययावत प्रयोगशाळा व प्रगत उपकरणे या भेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाहायला मिळाली.

जैव रसायनशास्त्राचे १८ विद्यार्थी आर. डी. महाविद्यालय येथे आयोजित Wild Vegetables and Ayurveda या विषयावरील व्याख्यानाला उपस्थित होते.

निगेटिव्ह विचार माणसाला कमजोर बनवतात; तर पॉझिटिव्ह विचार माणसाला नेहमी बलवान बनवतात.

## आय एस ओ प्रशिक्षण कार्यशाळा

बांदोडकर महाविद्यालयातील शिक्षकांकरता आय एस ओ प्रशिक्षण कार्यशाळा १८ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी दहा ते संध्याकाळी साडेपाच या वेळेत आयोजित करण्यात आली होती. श्री महेश चिलकवाड, प्रभारी संचालक, ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड यांनी या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.



## अनुबंध माजी विद्यार्थी संघटना

अनुबंध माजी विद्यार्थी संघटनेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या निमित्ताने करण्यात आले होते.

२५ जून २०२२ व ९ जुलै २०२२ रोजी 'ट्रान्सफॉर्मेशनल मेडिटेशन' या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री उमेश लळीत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा संपन्न झाली. विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम होण्याच्या दृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ४१ विद्यार्थी व ११ शिक्षक यांनी या कार्यशाळेमध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवला.



२७ ऑगस्ट २०२२ रोजी गणित विभागाची माजी विद्यार्थिनी सौ. अनुश्री तांबे सह-प्राध्यापक, सोमय्या, अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी Happy Folding या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

२ ऑगस्ट २०२२ रोजी रसायनशास्त्र विभागाचे माजी विद्यार्थी श्री. तेजस जाधव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## श्री रघुनंदन प्रभाकर आठल्ये गुणीजन पुरस्कार

१ ऑगस्ट २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोजस कोलेट यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. तसेच यावेळी श्री रघुनंदन प्रभाकर आठल्ये गुणीजन पुरस्कार माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्राध्यापक श्री अभिजीत काळे (शिक्षक वर्ग) यांना तसेच श्री. राकेश बने (शिक्षकेतर वर्ग) रसायन शास्त्र विभाग यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या अठ्ठावीस विद्यार्थ्यांचा त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्याकरता सत्कार करण्यात आला.



श्री राकेश बने



श्री अभिजीत काळे

## महाविद्यालयीन उपक्रम

युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन यांच्या आदेशानुसार प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता इंडक्शन प्रोग्राम जुलै महिन्यातील तिसरा आठवडा ते ऑगस्ट महिन्यातील पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात आले होते.

दिनांक २२ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२२ या कालावधीत ओल्ड क्लोज कलेक्शन ड्राईव्ह बांदोडकर महाविद्यालयात संपन्न झाले.

अडचणीच्या वेळेत सगळ्यात मोठा आधार म्हणजे स्वतःवरचा विश्वास जो मंद हास्य करत तुमच्या कानात प्रेमाने सांगत असतो, 'सगळं व्यवस्थित होईल'.

दिनांक २२ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या कालावधीत प्रजासत्ताक दिन परेड कॅम्प करता सिलेक्शन परेड महाविद्यालयामध्ये संपन्न झाली.

२४ ऑगस्ट रोजी महाविद्यालयामध्ये सत्यनारायण पूजा संपन्न झाली.

२६ ऑगस्ट २०२२ रोजी जिमखाना विभागाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. राजेश गाडगीळ यांच्या हस्ते संपन्न झाले.

३० ऑगस्ट २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक निर्णय अधिकारी आणि बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन मतदार नोंदणी आणि आधार कार्ड जोडणी याकरिता महाविद्यालयामध्ये कार्यक्रम आयोजित केला होता.

**सेंट्रल पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन सिस्टीम**

फाऊंडेशन कोर्स या विभागातर्फे सेंट्रल पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन सिस्टीम हा २री चा अभ्यासक्रम दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम श्री. सुधीर भोसले सहाय्यक प्राध्यापक फाऊंडेशन फोर्स विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाला.

**सायबर सेक्युरिटी**

क्विक हील फाऊंडेशन तर्फे कमवा व शिका या योजने अंतर्गत सायबर सेक्युरिटी या विषयावर माहिती तंत्रज्ञान विभागाच्या २६ विद्यार्थी आणि दोन शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यात आले.

**श्रद्धांजली**

डॉक्टर व्ही व्ही अंबिके, माजी विभागप्रमुख वनस्पतीशास्त्र विभाग यांचे १० ऑगस्ट २०२२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. अतिशय विद्यार्थी प्रेमी व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून ते ओळखले जात होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा कार्यक्रम

**तिरंगा वाटपाचा कार्यक्रम – ८ ऑगस्ट, २०२२**

स्वातंत्र्य दिनाच्या ७५ व्या वर्षाचे औचित्य साधून दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वा. विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा विधी महाविद्यालयाद्वारे 'हर घर तिरंगा' ह्या उपक्रमा अंतर्गत तिरंगा वाटपाच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रभारी प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद वाघ, ग्रंथपाल शितल सोनावणे, प्रा. हेतल मिशेरी, कार्यालय अधीक्षक श्रीमती रंजन करंदीकर ह्यांनी सर्व वर्गात जाऊन प्रत्येक विद्यार्थ्यांना तिरंगा दिला. प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार व प्रा.अंबर जोशी ह्यांनी विद्यार्थ्यांना तिरंग्याचे महत्त्व व सन्मानपूर्वक राष्ट्रध्वज फडकविण्याची योग्य पद्धत व त्याचे नियम समजावून सांगितले. विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद सदर कार्यक्रमास लाभला.

**राष्ट्रगीत गायन ९ ऑगस्ट, २०२२**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, देशात व राज्यात सध्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाची चळवळ असणाऱ्या 'चले जाव' चळवळीची सुरुवात मुंबई येथील ऑगस्ट क्रांती मैदान येथे झाली होती. त्यामुळे ९ ऑगस्ट या दिनाचे औचित्य साधून, स्वराज्य महोत्सव राज्यात सर्वत्र साजरा करण्यात आला. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या साथीने राष्ट्रगीत गायन करण्यात आले. त्या नंतर उपस्थित विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार व प्रा. विनोद वाघ ह्यांनी देखील गाण्यात विद्यार्थ्यांना साथ दिली.

**स्वच्छता अभियान – १० ऑगस्ट, २०२२**

आझादी का अमृत महोत्सव निमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता स्वछता अभियान राबविले. यासाठी जवळपास ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी व तसेच महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पाऊस असूनही मोठ्या जोशाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रांगणातील स्वच्छता मोहीम हाती घेऊन जवळपास २० विद्यार्थ्यांनी हातामध्ये छत्री घेऊन तर काहींनी भिजतच सर्व प्लास्टिक तसेच इतर कचरा मोठ्या पिशवीत भरून स्वच्छता केली. जवळपास ३० विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील एकूण १० वर्ग खोल्या व बाहेरील परिसर स्वच्छ केला. यावेळी प्रा. विनोद एच. वाघ, प्रा. हेतल मशेरी, ग्रंथपाल शीतल औताडे, कार्यालयीन कर्मचारी श्रीमती रंजन करंदीकर, श्री. मुकेश राणे, श्री. संतोष बोरघरे, श्री. रामेश्वर चव्हाण व इतर कर्मचारी उपस्थित होते.



**''ठाण्यातील ऐतिहासिक स्थळे'' भाषण स्पर्धा – ११ ऑगस्ट, २०२२**

आझादी का अमृत महोत्सव निमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महाविद्यालयामध्ये ''ठाण्यातील ऐतिहासिक स्थळे'' या विषयावर भाषण स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. परीक्षक म्हणून ॲड. अंबर जोशी उपस्थित होते. स्पर्धकांनी ठाण्यातील अनेक ऐतिहासिक बाबींवर चर्चा केली व त्याची माहिती दिली. या स्पर्धेममधील विजेते खालील प्रमाणे:

प्रथम पारितोषिक – विद्यार्थी विनायक शिवगण, तृतीय वर्ष विधी



द्वितीय पारितोषिक – क्षीतिजा खांगेते, तृतीय वर्ष विधी

तिसरे पारितोषिक – अक्षय राऊत आणि विकास चव्हाण यांना, प्रथम वर्ष विधी

**ध्वजारोहण आणि वृक्षारोपण १४–०८–२०२२**

विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांनी एकत्रित येत सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण कार्यक्रम केला. विज्ञान शाखेचे प्राचार्य मोझेस कोलेट ह्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विधी महाविद्यालय द्वारे महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांनी देखील ह्यात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रभारी प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार ह्यांनी स्वतः आणलेले रोपटे लावून वृक्षरोपणाची सुरुवात केली. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ह्यांनी देखील वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. वृक्षारोपण महाविद्यालय परिसरात केले असल्याकारणाने त्याची देखभाल करणे देखील सोपे होईल. अशा रीतीने दिनांक १४ ऑगस्टचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.







**प्रभातफेरी आणि ध्वजारोहण १५/०८/२०२२**

विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांनी एकत्रित येत सकाळी ७.०० वाजता प्रभात फेरीचे नियोजन करण्यात आले होते. सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ह्यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महाविद्यालय ते चेंदणी बस स्टॉप व परत महाविद्यालय अशा प्रकारे प्रभात फेरीचे प्रयोजन करण्यात आले होते. ''भारत माता कि जय, हर घर तिरंगा घर घर तिरंगा'' अशा घोषणांनी आजूबाजूचा परिसर गजबजून गेला होता. रस्त्यावरून जाणारे नागरिक देखील हे क्षण आपल्या मोबाइल मध्ये स्थलबद्ध करत होते. प्रभात फेरीची सांगता झाल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ विजय बेडेकर ह्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आपल्या प्रोत्साहन पर भाषणात सरांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत ज्याप्रमाणे देश प्रगती करत आहे त्या प्रमाणे विद्यार्थ्यांनी देखील प्रगतशील असावे असे मत मांडले. १३ ऑगस्ट पासूनच विद्यार्थ्यांना देण्यात आलेले झेंडे ते आपापल्या घरावर लावत होते आणि त्याचे फोटो काढून महाविद्यालयाच्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवीत होते. विद्यार्थ्यांनी ह्या संपूर्ण सोहळ्यात खूप उत्तम सहभाग नोंदवला.





**देशभक्ती पर गीत गायन स्पर्धा व स्वातंत्र सेनानी व्यक्तिमत्व साकारणे १६ ऑगस्ट २०२२**

आझादी का अमृत महोत्सव निमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या टी.एम. सी. विधी महाविद्यालयाने दिनांक १६ ऑगस्ट २०२२ रोजा सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयामध्ये ''देशभक्ती पर गीत गायन स्पर्धा व स्वातंत्र सेनानी व्यक्तिमत्व साकारणे'' या विषयावर भाषण स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. परीक्षक म्हणून प्रो. हेतल मिशेरी उपस्थित होते. विद्यार्थ्यांबरोबर कर्मचाऱ्यांपैकी श्री पद्माकर जाधव व प्रो. श्री यतीन पंडित ह्यांनी गीत गायन सादर केले. प्रथम वर्ष विधी च्या विद्यार्थ्यांनी सामूहिक गीत देखील सादर केले. तीन विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक व्यक्तींच्या प्रतिमा सादर करण्याचा प्रयत्न केला अशा रीतीने कार्यक्रम पार पडला.

**सदर स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे :**

**देशभक्ती गीत गायन स्पर्धा वैयक्तिक**

प्रथम पारितोषिक : प्रवीण मित्तल (तृतीय वर्ष विधी)

द्वितीय पारितोषिक : संदेश गावंड (प्रथम वर्ष विधी)

तृतीय पारितोषिक : अविनाश आनंद (तृतीय वर्ष विधी)

नेहमीच लहान बनून राहा. प्रत्येकजण तुमच्याबरोबर बसू शकतो, आणि
इतके मोठे व्हा की, जेव्हा आपण उठाल तेव्हा कोणीही बसलेले नसेल !

**देशभक्ती गीत गायन स्पर्धा–सामूहिक**

प्रथम पारितोषिक : सामूहिक गीत (प्रथम वर्ष विधी विद्यार्थी)

द्वितीय पारितोषिक : प्रीती भोईर, सोनम पाटील (तृतीय वर्ष विधी)

तृतीय पारितोषिक : साक्षी आणि मनिषा (प्रथम वर्ष विधी)

**ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व साकारणे स्पर्धा**

मनीषा झिटे (प्रथम वर्ष विधी)

वृषाली चंदे (प्रथम वर्ष विधी)

प्रमोद घोडके (तृतीय वर्ष विधी)

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या आर्मी, नेव्ही, एरफोर्सच्या विद्यार्थ्यांना देखील त्या दिवशी आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात अली व त्यांना ते करीत असलेल्या सेवेबद्दल धन्यवाद देण्यात आले.








**स्वराज्य फेरी, ऐतिहासिक चित्रपट १७–८–२०२२**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनांक ९ ते ७ ऑगस्ट पर्यंत साजरा झाला. शेवटच्या दिवशी म्हणजेच १७ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांनी मिळून स्वराज्य फेरीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान देण्याऱ्या महान व्यक्तिमत्त्व ह्यांच्या वेशभूषा करून ह्या फेरीत सहभाग घेतला. विधी महाविद्यालयातील प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार ह्यांनी देखील ह्या फेरीत सहभाग घेतला. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयात सामूहिक राष्ट्रीय गायन घेण्यात आले. सायंकाळी विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली होती. चार विद्यार्थिनींनी ह्यात सहभाग घेतला रांगोळी स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना क्रमांक प्राप्त झाला.

प्रथम पारितोषिक : अपेक्षा बेलावले

द्वितीय पारितोषिक : निकिता तलेशा

तृतीय पारितोषिक : प्रज्ञा जक्कलवार

रांगोळी स्पर्धेनंतर कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर गीत गायन केले. सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रित येऊन वंदे मातरम व इतर गाणी गायली आणि सर्वात शेवटी सर्वांसाठी संविधान पार्ट १० ह्याचे प्रसारण करण्यात आले. भारतीय संविधानाची रचना कशा प्रकारे करण्यात आली ह्याचे सुरेख चित्रीकरण ह्या चित्रपटात करण्यात आले आहे. अशा रीतीने महाविद्यालयात ‘आझादी का अमृत महोत्सव’ साजरा करण्यात आला.

१३ ऑगस्ट २०२२ रोजी सत्र – ६ चा निकाल जाहीर झाला. महाविद्यालयाचा निकाल ९६.४५ टक्के लागला आहे. २१ विद्यार्थ्यांना आठहून अधिक सिजीपीए गुण मिळाले आहेत. तृतीय वर्ष विधीचे निकाल पुढील प्रमाणे –

आज आराम करून आयुष्यभर कष्ट करण्यापेक्षा, शैक्षणिक जीवनात कष्ट करून आयुष्यभर आरामात जगा.

**६०:४० पॅटर्न निकाल**

* प्रथम क्रमांक : राव आर. रविकुमार – २१२९/३००० गुण
* व्दितीय क्रमांक : बर्थवाल सीमा २१११/३००० गुण
* तृतीय क्रमांक : मनारी सार्थ गोपीनाथ २१०८/३००० गुण

**१०० गुण पॅटर्न निकाल**

* फुंडे गणेश : ७३५/१००० गुण
* लेवीस प्रीती : ७०७/१००० गुण
* जोशुल्ला नव्या : ७००/१००० गुण

२९ आणि ३० ऑगस्ट, २०२२ रोजी मूल्यांकन लेखापरीक्षणासाठी माननीय संयुक्त संचालकांची टीम श्रीमती ज्ञानदा कदम (प्रशासकीय अधिकारी), श्री. खामकर, (लेखाधिकारी), श्री. साळुंखे, श्री. सोनावणे महाविद्यालयामध्ये आले होते.

**रिफ्रेशर कोर्स**

प्रा. विनोद एच. वाघ यांनी आपला दुसरा ऑनलाइन रिफ्रेशर कोर्स + श्रेणीसह पूर्ण केला.

**विषय : इमर्जिंग ट्रेण्डस इन लॉ : इंटरनॅशनल अँड नॅशनल परस्पेक्टिव्ह**

**संस्था : डॉक्टर हरिसिंग गौर विश्व विद्यालय (केंद्रीय विद्यापीठ) सागर (मध्यप्रदेश)**

**कालावधी : ४ जुलै, २०२२ ते १६ जुलै, २०२२ दरम्यान आयोजित केला होता.**

सुवर्णमहोत्सवी स्मरणिका सप्टेंबर २०२२ मध्ये प्रकाशन होण्यासाठी सज्ज होत आहे.

सत्र – दोन – सत्र – दोन च्या अंतर्गत परीक्षा सप्टेंबर मध्ये पूर्ण होतील.

**गुरु पौर्णिमा :**

विद्यार्थ्यांनी एक कार्यक्रम आयोजित करून सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

१) १६ ऑगस्ट २०२२ रोजी Institution Innovation Council ने World Entrepreneur day साजरा केला. सदर कार्यक्रम सौ. अर्चना कालिया (Innovation Ambassador) यांच्या व्याख्यानाने सादर झाला.

२) १६ ऑगस्ट २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने तर्फे ''आजादी का अमृत महोत्सव'' इन्फोरमेशन व टेक्नॉलॉजी विभागाने सादर केला. सदर कार्यक्रमात घोषवाक्याची स्पर्धा आयोजित केली.



३) दिनांक १३ ऑगस्ट महोत्सव (७५ वर्षे स्वातंत्र्याची) विभागातर्फे आजादी का अमृत महोत्सव (७५ वर्षे स्वातंत्र्याची) या कार्यक्रमात "Poster Making and Essay Competition" ही स्पर्धा आयोजित केली.

४) दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी Institution Innovation Council ने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत कॉम्प्युटर इंजिनिअरिंगने गायन स्पर्धेचे आयोजन केले.

५) दिनांक २६ ऑगस्ट २०२२ व Institution Innovation Council ने "Prototype Validation

- Innovation to start up" या विषयावर सेमिनार आयोजित केला. सदर कार्यक्रमात श्री. कल्पक सूर्यवंशी (CEO & founder - swastik life science) माजी विद्यार्थी विद्या प्रसारक तंत्रनिकेतन यांचे मार्गदर्शन लाभले.

६) विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इन्स्ट्रूमेनटेशन तृतीय वर्ष विभागातील विद्यार्थ्यांनी (Hackasten team) ने २६ ऑगस्ट २०२२ रोजी प्रथम runnerup पुरस्कार राष्ट्रीय स्तराच्या स्पर्धेत संपादन केला. सदर स्पर्धेत ७ हे विद्यार्थी ७५,०००/- बक्षिसाचे मानकरी ठरले. सदर स्पर्धेत खाली विद्यार्थ्यांनी सहभाग गेतला. विभाग प्रमुख सौ. वैशाली जोशी व प्राध्यापिका सौ. स्मिता खंडागळे यांचे मार्गदर्शन लाभले.



इन्स्ट्र्युमेनटेशन विभागाच्या श्रेयस आव्हाड, सौरभ दुबे, प्रेम बाऊसकर, तुषार शर्मा, अथर्व व भोगट व प्रकृती राठोड यांनी खालील प्रकल्पावर कार्य केले.

"Reconnaissance and surveillance Drone with Beacon"

७) ''आजादी का अमृत महोत्सव'' या कार्यक्रमाच्या अंतर्गत इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाने दि. १६ ऑगस्ट २०२२ रोजी Poster Exhibition on Techno Milestones & Innovations of Independent India विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रर्दशनात उपस्थिती दर्शविली. Nuclear Mission, Space Mission, Innovation by Indians, development of India in the digital world अशा विविध संकल्पनेवर विद्यार्थ्यांनी आपली पोस्टर्स प्रदर्शनात दाखविली. उत्तम व कल्पक पोस्टर्सना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**ऑगस्ट २०२२ मधील कार्यक्रम/वार्ता**

१ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या स्थापना दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ब्रिम्सच्या कामगिरीचा वार्षिक आढावा सादर केला.



२ ऑगस्ट : डॉ. कांचन यांनी एमएमएसच्या विद्यार्थ्यांसाठी केंब्रिजतर्फे संवाद कौशल्यावर एक सत्र आयोजित केले.

३ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या कार्यालयात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ऍग्रीकल्चर (MACCIA) च्या सदस्यांसोबत बैठक घेतली.

६ ऑगस्ट : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे एमबीए आणि एमएमएस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी सीईटीची पूर्वतयारी / मार्गदर्शन या विषयावर विनामूल्य सत्रांचे आयोजन केले गेले. प्रत्येक आठवड्याला एक सत्र

याप्रमाणे दिनांक ६, १२, २० ऑगस्ट रोजी परिसंवाद घेण्यात आले.



६ ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या प्रारंभाच्या निमित्ताने रक्तदान शिबिरात ब्रिम्सचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले.



८ ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे ध्वज वितरण व्यवस्था करण्यात आली. प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांसह एकूण २० ध्वजांचे वितरण / वाटप करण्यात आले.



९ ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने डॉ. व्ही एन ब्रिम्स मध्ये संचालक महोदय, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रित राष्ट्रगीत गायन केले.






१० ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले. ब्रिम्सचे प्राध्यापक आणि कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी झाले आणि १० झाडे लावण्यात आली.



१० ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांनी श्री. वैभव पंडित यांच्यासोबत एमबीएसाठी नियोजन या विषयावर एम एम एस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी एक सत्र आयोजित केले.



१२ ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थी विकास समिती (SDC) तर्फे डॉ. व्ही एन ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांनी 'आजादी का अमृत महोत्सव' या विषयावर एक प्रहसन सादर केले.



मोठा माणूस तोच जो आपल्या सोबतच्यांना छोटा समजत नाही.

१२ ऑगस्ट : पीतांबरीच्या कार्यालयात डॉ. नीतिन जोशी यांनी एचआर प्रमुखांची सल्लागार सेवेच्या संदर्भात भेट घेतली.

१३ ऑगस्ट : ए आय सी टी (AICTE) च्या अधिसूचने प्रमाणे विद्यार्थी विकास समिती (SDC) तर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षाच्या निमित्ताने देशभक्तीपर गीत गायन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले.




१५ ऑगस्ट : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले संचालक महोदय, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी या प्रभात फेरीत सहभागी झाले आणि त्यानंतर ध्वजवंदन आणि राष्ट्रगीत गायन करण्यात आले.



१७ ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे यांनी एम एम एस प्रवेशा साठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणापासून उद्योगापर्यंत (Academia Industry connect) या विषयावर वेबिनार आयोजित केला.

१९ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांनी थायलंड येथील थकसिन (Thaksin) विद्यापीठाला भेट देऊन, थकसिन विद्यापीठाशी सामंजस्य करार केला.




२३ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांना वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे संचालक निवडीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२५ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी AIMS येथे व्यवस्थापन शिक्षणाची पुनर्रचना.... भविष्याला आकार या विषयावर आधारित ३ दिवसीय AIMS अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहिले. तसेच डॉ. कांचन ए., प्रा. दीप्ती पेरीवाल यांच्यासह २ एम एम एस चे विद्यार्थी देखील २५ – २७ ऑगस्ट हे ३ दिवस AIMS अधिवेशनाला उपस्थित राहिले.



२५ ऑगस्ट : डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि प्रा. विभूती सावे यांनी आयक्यूएसी समितीच्या वतीने आयक्यूएसी फाऊंडेशन डे कार्यक्रमाचे आयोजन केले होते, या निमित्ताने ''व्यवस्थापन शिक्षणातील गुणवत्ता विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन'' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली.



२७ ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे यांना इंटरनॅशनल ॲकॅडमिक अँड रिसर्च एक्सलन्स (IARE) तर्फे उत्कृष्ट शिक्षक बेस्ट फॅकल्टी - फायनान्स हा पुरस्कार मिळाला.




२७ ऑगस्ट : माजी विद्यार्थी संघ आणि आय आय सी समिति तर्फे उद्योजकाच्या प्रवासावर ऑनलाइन अतिथी सत्राचे आयोजन केले होते. यावेळी २०१०-१२ तुकडीच्या माजी विद्यार्थिनी आणि उद्योजिका सारिका प्रभुदेसाई यांना आमंत्रित करण्यात आले. हे सत्र परस्पर संवादात्मक झाले.




२९ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांना पीएच.डी. करणाऱ्या विद्वानांच्या संशोधन प्रस्ताव समीक्षणासाठी आरएसी सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२९ ऑगस्ट : रोजगार नियुक्ती विभागाच्या श्वेता नायर यांनी एमएमएस २०२०-२०२२ च्या ५ विद्यार्थ्यांना बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) इंडियामध्ये वार्षिक ४ लाख पगारासह कोअर फायनान्स प्रोफाइलची रोजगार संधी उपलब्ध करून दिली.

**नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांची नावे :**

१) सुविधा भोसले २) गौरी भोसले ३) प्रसाद चव्हाण ४) धीरज दळवी ५) हिरामण ठोमरे

सर्वांना यशस्वी आणि उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा.

२९ ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. कांचन अक्षय, विद्यार्थी विकास समितीच्या (SDC) विद्यार्थी सदस्यांसह, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रिकल्चर, ठाणे विभागाने आयोजित केलेल्या एन्व्हरमेंट - रोडमॅप फॉर ठाणे या विषयावरील बैठकीला उपस्थित राहिल्या आणि परिसंवादा मध्ये सहभाग घेतला.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

शैक्षणिक वर्ष २०२२- २३ मध्ये अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम घेतले गेले. त्यातील महत्त्वाच्या उपक्रमांविषयीची माहिती या अहवालात दिली आहे.

दिनांक ०७ जून ते १३ जून २०२२ रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'स्वच्छ भारत, हरित भारत' या महत्त्वाकांक्षी मोहिमेसाठी 'पर्यावरण जागरूकता आणि स्वच्छता सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी स्वच्छ भारत मिशनचा प्रचार करण्यासाठी रॅली काढली. भारताला 'रोगमुक्त' बनवण्यासाठी व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळणेश्वर गावामध्ये विविध घोषणांनी जनजागृती फेरी काढली. तसेच प्राथमिक


आरोग्य केंद्र, वेळणेश्वर, प्राथमिक शाळा वेळणेश्वर, वेळणेश्वर मंदिर परिसर इत्यादी ठिकाणीही श्रमदान उपक्रम राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी समाजातील लोकांना स्वच्छता उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.



दिनांक २० जून ते २५ जून २०२२ या कालावधीत महाविद्यालयातील सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी 'गुगल वर्कस्पेसचा प्रभावी वापर' या नावाने एक आठवड्याचा विकास कार्यक्रम आयोजित केला. या कार्यशाळेचे संयोजन महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाने केले. या कार्यक्रमाचे आभासी उद्घाटन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाच्या डायरेक्टर डॉ. कीर्ती आगाशे यांनी या सत्रादरम्यान उपस्थितांना संबोधित केले. या कोर्सचा मुख्य उद्देश सहभागींना आवश्यक गुगल वर्कस्पेस उत्पादने आणि त्यांचा कामासाठी प्रभावी वापर करून परिचित करून देणे हा होता. यामध्ये प्रशिक्षण सत्र, सराव सत्र आणि असाइनमेंट या तीन सत्रांमध्ये दररोज चालणाऱ्या या ऑनलाइन विकास कार्यक्रमासाठी एकूण १७ सहभागींनी नोंदणी केली. या ४० तासाच्या कार्यशाळेत Gmail, Meet, Drive, Calendar, Forms, Docs, Sheets आणि Slides यासह सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या Google वर्कस्पेस उत्पादनांचा माहिती देण्यात आली. या कार्यशाळेचे मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे प्रा. औदुंबर पाटकर यांनी काम पाहिले. यावेळी सर्व सहभागींना ई-प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




दिनांक २१ जून २०२२ रोजी महाविद्यालयातील संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिल (IIC) व स्थापत्य अभियांत्रिकी विभाग यांच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी 'उद्योजक कौशल्यांचा विकास' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून कु. अदिती खोत (संस्थापक: सीईओ आणि डिझायनर, देस रंगीला) यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी उद्योजकीय कौशल्याबद्दलचे ज्ञान यावेळी सामायिक केले. त्याचबरोबर त्यांनी एक उद्योजक म्हणून त्यांच्या प्रवासाबद्दल सर्व माहिती सामायिक केली. उद्योजकांना त्यांची कौशल्ये आणि विपणन धोरणे वाढवण्यासाठी यावेळी विविध प्लॅटफॉर्मची माहिती देखील सांगितली.



दिनांक २१ जून २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभाग व संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिल (IIC) तर्फे विद्यार्थ्यांसाठी Intellectual Property Rights या विषयावर वेबिनार घेण्यात आला. याकरिता प्रमुख वक्ते श्री. नीलेश पुणतांबेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी Intellectual Property चा मूळ अर्थ आणि Intellectual Property Rights चे मुख्य प्रकार त्याचसोबत कॉपीराइट, पेटंट, औद्योगिक डिझाईन, ट्रेडमार्क, पेटंटसाठी अर्ज करता येतो इत्यादींची ओळख त्यांनी यावेळी करून दिली.

दिनांक ०४ जुलै ते ०८ जुलै २०२२ या कालावधीत अखिल भारतीय परिषद (AICTE) ने 'तंत्रशिक्षणातील सार्वत्रिक मानवी मूल्ये वाढवणे' या विषयावर पाच दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने, प्रयोगशाळा सहाय्यक श्री. संभाजी लोहार यांनी सहभाग नोंदविला.




महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे प्रा. गणेश दिवे यांनी Fantasy and Satire in the select novels of Terry Pratchett: - case Study या शीर्षकाचा त्यांचा पीएच.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर केला.

दिनांक १३ जुलै २०२२ रोजी गुरु पौर्णिमा निमित्त महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांचा सत्कार केला. गणेश पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांचे कृतज्ञता व प्रेम व्यक्त केले. यावेळी मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. शुभांगी चौगुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मिठाई वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.




दिनांक १५ जुलै २०२२ रोजी महाविद्यालयाच्या डायरेक्टर डॉ. कीर्ती आगाशे यांनी महाविद्यालयातील इंस्ट्रूमेंटेशन विभागातील शिक्षकांना 'गुगल क्लासरुम' या Teaching-Learning Platform विषयी मार्गदर्शन केले.



दिनांक १८ जुलै २०२२ रोजी महाविद्यालयातील Internal Quality Assurance Cell कमिटीची पहिली बैठक घेण्यात आली. यावेळी IQ-C Co-coordinator प्रा. केतन कुंडीया यांनी कमिटीतील सदस्यांशी बैठकीच्या अजेंड्यावर विस्तृत चर्चा केली.



दिनांक २७ जुलै २०२२ रोजी डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी निमित्त इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाने विद्यार्थ्यांसाठी Quiz Competition चे आयोजन केले. त्यामध्ये विद्यार्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच विद्यार्थी आणि शिक्षकांनी डॉ. कलाम यांच्या विषयी आपले मनोगतही व्यक्त केले. प्रा. केशव चौगुले यांनी संयोजक म्हणून काम पाहिले.



दिनांक २७ जुलै २०२२ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाने "KNOW YOUR HEROES" या ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते. तसेच यावेळी त्यांच्या जीवनावरील माहितीपट प्रदर्शित करून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. निखिल पांढरपट्टे यांनी काम पाहिले.



दिनांक २७ जुलै २०२२ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाद्वारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या दिवशी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे सर्व विद्यार्थी महापुरुषाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी एकत्र जमले होते. विद्याशाखा सदस्य प्रा. मंदार पावरी यांनी डॉ. कलाम यांच्या कर्तृत्वाची आणि जीवनप्रवासाची माहिती विद्यार्थ्यांशी शेअर केली. विभागातील दोन विद्यार्थ्यांनी देखील डॉ. कलाम यांच्याबद्दल काही मौल्यवान माहिती देखील शेअर केली.



दिनांक २८ जुलै २०२२ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने निसर्ग संवर्धन दिनानिमित्त विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या डायरेक्टर डॉ. कीर्ती आगाशे यांनी उपस्थितांना संबोधित केले. डॉ. आगाशे यांनी भावी स्थापत्य अभियंता बनू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तव्यांवर प्रकाश टाकला. स्थापत्य अभियंता या नात्याने विद्यार्थ्यांना निसर्गाची हानी न करता पायाभूत सुविधांचा विकास कसा करायचा हे माहित असले पाहिजे. तसेच यावेळी त्यांनी संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट इत्यादी माध्यमांद्वारे विद्यार्थ्यांनी आपली वैयक्तिक प्रगती कशी साधावी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.



दिनांक २८ ते ३० जुलै २०२२ दरम्यान महाविद्यालयाच्या पब्लिसिटी विभागाचा एक भाग म्हणून महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी बारावी विज्ञान शाखेतील कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भेटी देऊन त्यांच्याशी संवाद साधला. बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमाविषयी माहिती देणे हा या भेटीचा उद्देश होता. यावेळी गुहागर व चिपळूण तालुक्यातील ११ कनिष्ठ महाविद्यालये, तसेच खेड, दापोली आणि मंडणगड तालुक्यातील १२३ कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी देण्यात आल्या.

दिनांक ३० जुलै २०२२ रोजी विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थी कौन्सिल (EESA) ने 'वृक्षारोपण' कार्यक्रम महाविद्यालय परिसरात आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी एकूण २० विद्यार्थी, चार प्राध्यापक आणि एक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा उद्देश आहे. यावेळी प्रत्येकी एक झाड दोन विद्यार्थ्यांना दिले जाते. जे त्याची/तिची पदवी पूर्ण होईपर्यंत लागवड केलेल्या झाडाची काळजी घेतील. अशाप्रकारचा उपक्रम दरवर्षी महाविद्यालयात जोपासला जातो. यादरम्यान एकूण दहा झाडे लावण्यात आली. यामध्ये तीन रॉयल पॉइन्सियाना (गुलमोहर) आणि सात वटवृक्ष इत्यादींचा समावेश होता.




घड्याळ पाहू नका. ते जे काम करतं ते करा. पुढे जात रहा.

दिनांक ३० जुलै २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रा.योगेश काटदरे यांनी. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय योगदानासंबंधी सर्व माहिती उपस्थितांना दिली. भारतीय अंतराळ संस्था (ISRO) आणि भारताचा अण्वस्त्र कार्यक्रम, तसेच भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची स्थापना आणि नेतृत्व यावर उपस्थितांना सविस्तर संबोधित केले. या कार्यक्रमात एकूण ३३ विद्यार्थी सहभागी झाले होते.



दिनांक ३० जुलै २०२२ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाद्वारे तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी मधील प्रगती या विषयावर डॉ. राजेंद्र मगर, सदस्य बोर्ड ऑफ स्टडीज, मुंबई विद्यापीठ यांना सदर व्याख्यानासाठी संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. हे व्याख्यान गुगल मीट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मखाली घेण्यात आला. डॉ. राजेंद्र मगर यांनी स्थापत्य अभियांत्रिकीतील सर्व प्रगतीबद्दल त्यांचे ज्ञान सांगितले. त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी मधील विविध सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील उच्च शिक्षण आणि विविध नोकरीच्या संधींबद्दलची सर्व माहिती शेअर केली. तसेच सर्व सॉफ्टवेअर आधारित प्रगतीची माहिती सामायिक केली आणि विद्यार्थ्यांना अभियंता म्हणून त्यांची कौशल्ये वाढविण्यासाठी नवीनतम सॉफ्टवेअर शिकण्यास प्रोत्साहित केले.



दिनांक ०२ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने वरिष्ठ वैज्ञानिक परिषदेचे सदस्य श्री. शिरीश आगरकर यांच्यासमवेत बीई प्रोजेक्ट शीर्षक सादरीकरण यशस्वीरित्या आयोजित केले. या कार्यक्रमासाठी प्रा. प्रीती साठे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अभ्यासक्रमाच्या आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना शीर्षक निवडीसाठी सादरीकरण द्यावे लागते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयांशी संबंधित शीर्षक सादरीकरण दिले. एकूण चार गटांनी त्यांच्या प्रकल्पांच्या कल्पना सादर केल्या. वरिष्ठ वैज्ञानिक परिषदेचे सदस्य श्री. शिरीष आगरकर यांनी प्रत्येक प्रकल्पात असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रकल्प डिझाइनिंग आणि अंमलबजावणीच्या सर्व बाबींवर मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांसह त्यांच्या प्रश्नांसह संवाद साधला.

दिनांक ०३ ऑगस्ट २०२२ रोजी इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील माजी विद्यार्थी कु. इश्तीयाक पटाईत याने 'Job Opportunities after Instrumentation Engineering' ह्या विषयावर महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थांना मार्गदर्शन केले.



दिनांक ०३ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील Internal Quality Assurance Cell कमिटीची बैठक घेण्यात आली. यावेळी IQ-C Co-coordinator प्रा. केतन कुंडीया यांनी कमिटीतील सदस्यांशी बैठकीच्या अजेंड्यावर विस्तृत चर्चा केली.



दिनांक ०८ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने विद्यार्थ्यांसाठी सात दिवसीय 'STAAD Pro. Software' या विषयावर कार्यशाळा पार पाडली. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून मिस. सानिका पवार (कॅड डेस्क, रत्नागिरी) यांना आमंत्रित करण्यात आले होते.

STAAD किंवा (STAAD.Pro) हे स्ट्रक्चरल ॲनालिसिस आणि डिझाईन सॉफ्टवेअर आहे. STAAD.Pro हे जगभरात सर्वाधिक वापरले जाणारे संरचनात्मक विश्लेषण आणि डिझाइन सॉफ्टवेअर उत्पादनांपैकी एक आहे. STAAD हे स्ट्रक्चरल ॲनालिसिस आणि डिझाइनचे संक्षिप्त रूप आहे. याचा इमारती, पूल, औद्योगिक, वाहतूक आणि उपयुक्तता संरचना, ओव्हरहेड वॉटर टँक, अंडरग्राउंड वॉटर टँक, रिटेनिंग वॉल आणि शिअर वॉल इत्यादी संरचनांचे विश्लेषण आणि डिझाइन करण्यासाठी वापर केला जातो.



### ''स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'' अभियानांतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रम संपन्न

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ''स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अभियाना अंतर्गत'' उच्च शिक्षण कोकण विभाग यांच्या निर्देशानुसार दि. ९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रुप ग्रामपंचायत वेळणेश्वर-वाडदई येथील कर्मचारी यांना राष्ट्रीय ध्वज वितरित करण्यात आले.

दि. १० ऑगस्ट रोजी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. दि. १२ ऑगस्ट रोजी ''आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे'' औचित्य साधून धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. दि. १३ आणि १४ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.

दि. १५ ऑगस्ट रोजी ''वंदे मातरम'' या गीताचे स्वांतत्र्य लढ्यातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या समन्वयक डॉ. कीर्ती आगासे यांनी ध्वजारोहण सोहळ्यानंतर संपूर्ण वंदे मातरम गीताचे गायन केले.

दि. १६ ऑगस्ट रोजी रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. दि. १७ ऑगस्ट रोजी निबंध स्पर्धा व स्वराज्य सप्ताह उपक्रमांतर्गत ''समूह राष्ट्रगीत'' गायन करण्यात आले.





दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने सर्व विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थांसाठी Latex, Report Writing and Presentation Skills या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये प्रा. योगेश काटदरे यांनी मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रकल्प अहवालाचे विविध स्वरूप आणि नियम या बद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी साहित्य पुनरावलोकन, प्रस्तावित कार्यपद्धती आणि संदर्भ लिहिण्याचे मानक स्वरूप या मूलभूत संकल्पनेचे स्पष्टीकरण देखील दिले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. वैभवी मेथा यांनी Latex मधील प्रस्तावना आणि त्यामधील माहिती यांची मूलभूत रचना या बद्दल माहिती दिली. त्यानंतर अहवालातील संदर्भासाठी BIB फाईल कशी तयार करावी या बद्दल माहिती दिली. कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रामध्ये प्रा. सतीश घोरपडे यांनी प्रकल्प अहवालाच्या सादरीकरणासाठी सर्व नीतीशास्त्रांचे अनुसरण कशा प्रकारे केले पाहिजे या बद्दल माहिती दिली. तसेच व्यावसायिक पॉवर पॉइंट सादरीकरणासाठी लागणारे मानक स्वरूप देखील स्पष्ट केले. या कार्यशाळेत एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. वैभवी मेथा यांनी काम पाहिले.

दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयाच्या Institutional Innovation Council (IIC) च्या वतीने 'Poster Making Competition' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर भारत व उद्योजकता ह्या विषयांवर नावीन्यपूर्ण असे पोस्टर्स सादर केले. प्रा. मिना कश्यप आणि प्रा. वैशाली राणे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.







दिनांक १७ ऑगस्ट २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळ संचालित ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. नरेंद्र गोळे व श्री. रंगनाथ सराफ यांनी इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. केशव चौगुले यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.




कल्पनाशक्ती आपल्याला सर्वत्र घेऊन जाते. इच्छाशक्ती स्वप्न पूर्ण करते.

दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग व इंस्टीट्युशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय वेबिनार आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'MoE च्या इनोव्हेशन सेलच्या विविध योजना' या विषयावर वेबिनारचे संपन्न झाले. या वेबिनारसाठी अधिव्याख्यात्या म्हणून डॉ. उषा राघवन होत्या. त्यांनी IIC, Innovation - mbassadors, NISP, ARIIA, YUKTI, KAPILA, NEAT अशा विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

दिनांक २२ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयाच्या Institutional Innovation Council (IIC) व इंस्ट्रूमेंटेशन विभागाच्या वतीने 'Incubation Opportunities for Students and Faculties' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत शिक्षक आणि विद्यार्थांना AIC STPINEXT INITIATIVES चे चिफ ऑपरेटींग ऑफीसर श्री. प्रदीप ढगे यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी सर्व सहभागींना ई-प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. मीना कश्यप यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.




दिनांक २३ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग व इन्स्टीट्युशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'How to Target Funding Opportunities against Idea' या विषयावर सत्र संपन्न झाले. या सत्राचे अधिव्याख्याते श्री. प्रदीप ढगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना टीआरएल आणि त्याचे मोजमाप कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले. निधीसाठी कोण अर्ज करू शकतो, NIDHI कार्यक्रम आणि त्यातील महत्त्वाच्या योजनांची माहिती त्यांनी दिली. आंतरराष्ट्रीय निधी एजन्सींची माहितीही त्यांनी शेअर केली.




दिनांक २७ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाद्वारे महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांकरिता 'ॲप्टीट्युड टेस्ट' घेण्यात आली. यामध्ये एकूण १४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. करिअर निवडीसाठी मानसशास्त्रीय ॲप्टिट्यूड टेस्ट घेणे आवश्यक असते. ॲप्टिट्यूड टेस्टचे विविध भागात विभाजन होते. यामध्ये अभिरुची (इंटरेस्ट) चाचणी, बुद्धिमापन (इंटेलिजन्स) चाचणी, अभिक्षमता (ॲप्टिट्युड) चाचणी आणि व्यक्तिमत्त्व (पर्सनॅलिटी) चाचणी आदींचा समावेश होतो. व्यवसाय अथवा नोकरीच्या जीवनपद्धतीशी आपला स्वभाव जुळतोय की नाही, हे यातून पाहता येतं. काही व्यवसाय अथवा नोकरीमध्ये बुद्धिमत्तेबरोबरीनेच व्यक्तिमत्त्वाचे अन्य पैलूदेखील महत्त्वपूर्ण ठरतात. याकरिता ॲप्टिट्यूड टेस्ट मोलाची भूमिका निभावत असते.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.